नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत मराठी अभ्यास परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या भाषा आणि जीवन ह्या नियतकालिकाच्या (त्रैमासिक) अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून मराठी अभ्यास परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.
   वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व मराठी अभ्यास परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

# मराठी अभ्यास परिषद पत्रिका

## भाषा आणि जीवन

वर्ष ४ : अंक २ : उन्हाळा १९८६



## अनुक्रम



---

**प्रकाशन** : त्रैमासिक ( जानेवारी, मार्च, जून, ऑक्टोबर )
**संपादन समिती** : अशोक रा. केळकर ( प्रमुख ), कल्याण काळे, अंजली सोमण, द. दि. पुंडे, प्र. ना. परांजपे, मॅक्सीन बर्न्सन
**संपादकीय संपर्क व परीक्षणार्थ पुस्तके** : ए–२ परिमल, १२३९–ए आपटे रस्ता, पुणे ४११००४ (दूरध्वनी ५९२५८)
**व्यवस्थापकीय संपर्क व पैशाचा भरणा** : चिटणीस, मराठी अभ्यास परिषद, १।८ आगरकर नगर, पुणे ४११ ००१ ( फोन ६३४९६, शिवाय फोन ५४०६९ )
**पत्रिकेची वर्गणी, परिषदेची वर्गणी, जाहिरातीचे दर** : आवरणपृष्ठ तीन पहा.

**सूचना** : पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखकांच्या मतांशी संपादक किंवा परिषद सहमत असतीलच असे नाही.

या अंकाच्या मुद्रणासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

---

संपादक : अशोक रा. केळकर / प्रकाशक व मुद्रक : मराठी अभ्यास परिषदेसाठी प्र. ना. परांजपे / मुद्रणस्थळ : संजीव मुद्रणालय, ४६९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ३०.

संपादकीय

# व्याख्यान संज्ञापनाचं कालबाह्य माध्यम

चोखंदळ मराठी वाचकाला शरच्चंद्र मुक्तिबोध हे कवी, लेखक आणि समीक्षक म्हणून माहीत आहेत. पण सभासंमेलनांतून मिसळण्याचा मुक्तिबोधांचा स्वभाव नसल्यामुळे त्यांचं 'वक्ता' हे रूप फारच थोडयांच्या परिचयाचं असेल. माझ्या पिढीतील लोकांनी मुक्तिबोधांना बघितलं असण्याचाही संभव कमी. कालच्या पिढीतील एका लेखिकेच्या दैनंदिनीतील काही नोंदी योगायोगाने मला बघायला मिळाल्या. महत्त्वाच्या साहित्यिक घटनांविषयीच्या प्रतिक्रिया या नोंदींतून फार चांगल्या व्यक्त झाल्या आहेत असं दैनंदिनीची पानं चाळत असताना मला वाटलं. या नोंदी घटना घडल्यानंतर लगेच केलेल्या असल्यामुळे त्यात ताजेपणा होता. थोडं अभ्यासपूर्ण दृष्टीनं बघितलं तर त्या विशिष्ट काळातील वाङ्मयीन आणि सामाजिक वातावरणाचा पोत लेखिकेच्या प्रतिक्रियांमधून जाणवत होता. शिवाय या घटनांकडे वघण्याचा स्वभावपरिस्थितिजन्य असा एक दृष्टिकोन लेखिकेपाशी होता. या दृष्टिकोनाचे रंग सहजपणे तपशिलात मिसळले होते. लेखिकेच्या दृष्टिकोनाचा परिणाम घटनांच्या निवडीवर आणि भाषेच्या मांडणीवर झालेला स्पष्टपणे दिसत होता.

पुण्यातील साहित्य परिषदेत मुक्तिबोधांचे व्याख्यान ऐकल्यानंतर लेखिकेने केलेली नोंद साधारणत: अशी होती "आज नागपूरचे कवी शरच्चंद्र मुक्तिबोध यांचे 'गतवर्षीचे काव्य' या विषयावर पटवर्धन हॉलमध्ये व्याख्यान झाले. त्यांनी आपले व्याख्यान लिहून आणले होते. ते अशा सुंदर तऱ्हेने वाचले की बोलल्यासारखेच वाटले. शिवाय विषय असा छान रंगवला की त्यांचा व्यासंग आणि विद्वत्ता दिसून आली. वाचणार म्हटल्यावर लोकांनी अशा मुद्रा केल्या की व्याख्याता नवशिका व अपरिपक्व असल्याचे आपण जणू जाणलेच. पण व्याख्यान संपल्यावर सर्वांना ते फार आवडल्याचे दिसले सखोल अभ्यास करून व्याख्यान लिहिले आहे हे पटले. मात्र पुण्याचे लोक मोठे विक्षिप्त खरे. परगावचा पाहुणा आला आहे — त्याला ऐकू, निदान पाहू तरी अशा जिज्ञासेनेसुद्धा व्याख्यानाला यायचे नाहीत- आज फार थोडे लोक व्याख्यानाला आले होते." — ही नोंद नोव्हेंबर १९५५ मधली होती.

मुक्तिबोधांच्या 'वक्ता' या रूपाला मनमोकळी दाद लेखिकेने वरील नोंदीत दिलेली आहेच. पण याखेरीज 'व्याख्यान' या संज्ञापन माध्यमाविषयीचे मराठी श्रोत्यांचे ग्रह (आणि पूर्वग्रहही) यातून स्पष्ट झाले आहेत. जो व्याख्यान वाचून

दाखवतो तो नवशिका वक्ता. जो हातात मुद्द्यांचं टिपण ठेवून बोलतो तो कच्च्या स्मरणशक्तीचा किंवा सभाधीटपणात कमी पडणारा. उत्स्फूर्तपणे, अस्खलितपणे. स्मरणशक्तीच्या जोरावर जो केवळ 'बोलतो' तोच खरा चांगला वक्ता. लयदार—खणखणीत आवाज, उत्तम स्मरणशक्ती, अल्पशी अभिनयाची जोड, प्रसंगोचित विनोदांची पेरणी आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या, खिळवून ठेवणाऱ्या प्रवाही शब्दांचा वैविध्यपूर्ण वापर ही आपल्याकडे उत्तम वक्तृत्वाची महत्त्वाची साधनं मानली गेली आहेत. अगदी उत्तम वक्तृत्वाविषयीच्या आपल्या कल्पना फारशा बदलल्या असतील असं वाटत नाही. उत्तम वक्त्यापाशी वरील आयुधं बहुसंख्येनं असायला हवीत याबद्दल दुमत नाही. पण यशस्वी व्याख्यानाची ही बाह्य लक्षणे झाली. मंत्रमुग्ध करणाऱ्या आवाजामागे खिळवून ठेवणारा सुसंगत, मौलिक विचारांचा साठा असावा लागतो या वस्तुस्थितीकडे बरेचसे वक्ते आणि श्रोते दुर्लक्ष करतात असं नाही का वाटत ? या संदर्भात पुण्यातील व्याख्यानमालांवर १८९८ साली विठ्ठल रामजी शिंदे यांनी केलेली टीका लक्षात घेण्याजोगी आहे — "पुण्याच्या सार्वजनिक सभांतून एखाद्या वक्त्यास टाळ्या मिळाल्या की त्याने काही पोरकटपण केला असावा असे बाहेरच्याने समजावे." किंवा "व्याख्यानमालेच्याद्वारे महाराष्ट्रातल्या चार विद्वान डोक्यात ज्या काही विचारांची वर्षभर घालमेल होत असेल ती सर्व लोकांपुढे आली पाहिजे — असे न होता मालासंप्रदाय आहे म्हणून काही तरी शिळोप्याच्या गप्पा होतात. आमच्या व्याख्यानमाला व आमचे विवाह ह्यात बरेच साम्य आहे. विवाह झाला म्हणून जोडप्यास एकमेकांवर प्रीती करणे भाग आहे. प्रीती असते म्हणून विवाह होत नसतो —" (महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची रोजनिशी, संपादन गो. मा. पवार, १९७९) शिंदे यांची टीका परखड आणि स्पष्ट आहे. सर्व व्याख्यानांना नसली तरी लोकप्रिय व्याख्यानांना ती आजही बऱ्याच प्रमाणात लागू पडणारी आहे. विचारांचा साठा ही वक्त्याच्या दृष्टीने एक सोन्याची खाण असते. अस्खलित वक्तृत्वाच्या आहारी जाऊन या खाणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वक्त्यापेक्षा या खाणीशी इमान राखण्यासाठी हातात मुद्द्यांचं टिपण ठेवणारा वक्ता मला स्वतःला परवडतो.

आता थोडंसं पुणेरी विक्षिप्तपणाबद्दल. वर उल्लेखिलेली लेखिका पुण्याबाहेरची असल्यामुळे तिनं आपल्या दैनंदिनीत पुणेकरांचा विक्षिप्तपणा जास्त तिरकसपणे व्यक्त केला असेल असे मानू. पुणेकर विक्षिप्तपणाबद्दल प्रसिद्ध आहेत तसे चोखंदळपणाबद्दलही प्रसिद्ध आहेत. असं असूनही एके काळी पुण्यामध्ये व्याख्यानांना गर्दी लोटत असे. (गर्दीचं मोजमाप अर्थातच त्या त्या काळातील लोकसंख्येच्या संदर्भातच करायचं.) आज व्याख्यान वाङ्मयीन असो की सामाजिक—राजकीय विषयावरचं असो, श्रोत्यांची तुरळक उपस्थिती ही पुण्यामध्ये संयोजकांची डोकेदुखी बनू

बघत आहे. उन्हाळचात गर्दीन फुलणाऱ्या 'वसंत व्याख्यानमाले' च्या श्रोत्यांची उपस्थिती आता रोडावू लागली आहे. शंभर वर्ष पूर्ण केलेल्या या मालेचं भवितव्य काय, हा प्रश्न संबंधितांच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या वेळी राजकीय सभांनाही म्हणावी तशी गर्दी झाली नाही. या काळात चौका–चौकातून विविध राजकीय पक्षांच्या सभा झाल्या. आपल्या राजकीय पुढाऱ्यांचे विचार ऐकण्यासाठी ठाण मांडून बसणारे श्रोते आता कमी दिसतात. चौका–चौकात हिंडून आणि थोडी थोडी भाषणं ऐकत 'शितावरून भाताची परीक्षा' करणारे 'फिरते' श्रोते जास्त दिसायला लागले आहेत. तिशी–चाळिशीच्या घरामध्ये असलेले आजचे चांगले वक्ते सुद्धा सभांमधून भाषणं करायला फारसे खूष नसतात. 'भाषण नको हो, अनौपचारिक चर्चा ठेवा.' किंवा 'श्रोत्यांना प्रश्न विचारू दे मी उत्तरं देईन' अशा सूचना त्यांच्याकडून संयोजकांना जातात. सर्वात कडी पुण्यातील एका महाविद्यालयानं आपल्या कार्यक्रमाची जाहिरात करताना नुकतीच केली. विद्यार्थ्यांसाठी विविध–गुण दर्शनाचं आणि व्यक्तिमत्त्व विकासाचं एक शिविर या महाविद्यालयानं आयोजित केलं होतं. वृत्तपत्रात त्याचं निवेदन पुढीलप्रमाणं दिलं गेलं : "शिविरात युवकांच्या समस्यांवर गटचर्चा आणि सदीप व्याख्याने होतील–(स्लाईड शो). भाषणबाजी अजिबात नाही."

विठ्ठल रामजी शिंदे जर आज आपल्यात असते तर त्यांना हे बघून काय वाटलं असतं ? या बदललेल्या वाऱ्याचं पुणे शहर हे केवळ प्रातिनिधिक रूप आहे. औद्योगीकरण झपाटचात मोठचा होत जाणाऱ्या आजूबाजूच्या गावांकडे हे बदलते वारे यथावकाश पोहोचतील. १९५५ सालच्या त्या नोंदीत या भविष्याची सूचना होती का ? लोकांना नकोशी झाली आहेत ती व्याख्यानं का व्याख्यानबाजी ? बरं व्याख्यान हे माध्यमच आजच्या परिस्थितीत निरुपयोगी ठरणार असेल तर मग शैक्षणिक संज्ञापनाचं काय ?

**अंजली सोमण**

## वक्त्याची व्याख्या

वक्ता म्हणजे तो मनुष्य की जो मंत्रमुग्ध करणारा अस्खलित आवाज निर्माण करताना वस्तुस्थितीचे विश्लेषण आड येऊ देत नाही.

**(रीडर्स डायजेस्ट, नोव्हेंबर १९७८)**

# समासोक्ती

## माधव ना. आचार्य

'महाराष्ट्र टाईम्स्' च्या २३ जुलै १९८५ च्या अंकातील 'बहुताची अंतरे' या सदरात आलेल्या एका पत्राने माझे लक्ष वेधून घेतले. श्रीमती सुलभा जोगळेकर, ठाणे यांच्या त्या पत्रातील महत्त्वाचा भाग असा– 'काही दिवसांपूर्वी एका लॉ कॉलेजची प्रातःशाखा उघडण्यात आली होती. वर्तमानपत्रात बातमीचा मथळा होता– **प्रातर्विधी कॉलेज सुरू.** सकाळचे विधी (लॉ) कॉलेजचे चक्क संस्कृत भाषांतर. परंतु प्रातर्विधी या शब्दाला दुसरा रूढ अर्थ आहे, हे भाषांतरकर्त्याच्या लक्षात आले नाही. अर्थाचा अनर्थ होऊन छान विनोद निर्माण झाला.'

हा प्रकार नकळत झाला असेलही. परंतु पुष्कळ वेळा जाणीवपूर्वक काही सामासिक शब्द घडविले जातात. त्यामागे अनेक हेतू असतात. केवळ धंद्याच्या हेतूने घडविलेला एक मराठी समास नुकताच वाचनात आला. श्री. ग. बा. ताम्हणे यांच्या 'कोकणची पाऊलवाट' (१९८२) ह्या आत्मवृत्तामध्ये १९१४ च्या सुमाराची हर्णे येथील एक हकीगत येते. मुर्डी येथील बिवलकर व पेंडसे या दोन वैद्यांच्या स्पर्धेची ही हकीगत देताना श्री. ताम्हणे लिहितात– '– या दोघांमध्ये बरीच व्यापारी चुरस दिसून येई. एक 'आर्य महौषधालय' तर दुसरा 'आर्य वनौषधालय'. एकाचे 'थंडगार नेत्रांजन' तर दुसऱ्याचे 'अपूर्व नेत्रांजन'. एकाच्या औषधी गोळ्यांचे नाव 'अश्वकंचुकी' तर दुसऱ्याने त्याचे बरोबर मराठी रूपांतर करून दिलेले नाव. '**घोडाचोळी**'

प्रस्तुत आत्मवृत्तात श्री. ताम्हणे यांनी, माधवराव पटवर्धनांनी भाषाशुद्धीच्या वेडापायी स्वतःच्या काव्यावरही जो व्रात्यस्तोम विधीचा प्रयोग सुरू केला होता, त्याचाही उल्लेख केला आहे.

या उल्लेखावरून माधवरावांच्या अनेक प्रकारच्या सामासिक 'शब्दांचीही आठवण येते. 'विरहतरंग'च्या वाचकांना 'वडबोगदा' 'शाद्वलगालिचे'! 'दृष्टिराग' (Love at first sight), 'फुलपात्र' (Flower Pot), 'संध्याग्रह' (Evening star) 'धूम्रदीप' (gaslight) इत्यादी शब्द सहज आठवतील. हे शब्द मुद्दाम बनविले गेले आहेत. परंतु काही वेळा मुळात भाषेत रूढ असलेला शब्दही वेगळा अर्थ व्यक्त करण्यासाठी ते योजतात. उदा. शिवरात्र (Good night), क्षेत्रज्ञ अच्युत (= शेतकरी).

'नकुलालंकार' या काव्यातही माधवरावांनी असे काही सामासिक शब्द

मुद्दाम वापरलेले आहेत. शीर्षशिक्षक (हेडमास्तर), चामलोणी (स्नो), माथेरान (डोक्यावरील केस), कर्तरिप्रयोग (कातरीचा उपयोग), भर्तृहरी (भर्त्याचे हरण करणारा), बंधमोक्ष (घटस्फोट), नेपथ्यपाठ (Curtain Lectute)[१] कलानाथ (Master of Arts) – ही सहज सापडणारी काही उदाहरणे. या काव्यात अनंत काकबा प्रियोळकर यांचा उलेख चक्क 'काकसुत' असा माधवरावांनी केला आहे.

'नकुलालंकार' मधील आणखी एक गंमत नोंदण्यासारखी आहे. आचार्य अत्र्यांची विडंबने प्रसिद्धच आहेत. 'मी विडंबनकार कसा झालो?' या लेखात ते एके ठिकाणी म्हणतात, " (श्री. नी.) चापेकरांना प्रत्येक शब्दामागे 'सन्' आणि 'सु' चे टोपण घालण्याचे विलक्षण वेड होते. त्याचे मी 'सदंगि माझा सत्कोट। सत्पगडीचा वर थाट' असे विडंबन केल्यामुळे ते माझ्यावर जाम भडकले "

'नकुलालंकार' मध्येही चापेकरांच्या या सामासिक उद्योगाची माधवरावांनी चांगलीच टिंगल केली आहे. डॉ. पंडितरावांचे चित्र रेखाटताना ते लिहितात–

हे सदुपसर्ग देउनि किति नामांना करीत सत्पंथी
'सत्' ची कुठेतरी त्या मेंदूमध्ये असेल सद्ग्रंथी. (२८६)

अत्र्यांच्या विडंबनाइतके नकुलालंकार रसिकप्रिय नसल्यामुळे ही गंमत दुर्लक्षित राहिली आहे.

सामासिक शब्दाचा वेगळ्या प्रकारे विग्रह करून त्यातील घटक शब्दांचे श्लिष्टार्थ व्यक्त करणारा प्रकारही विनोदासाठी वापरला जातो. जुन्या नाटकाच्या प्रस्तावनेतील एक सहज आठवलेले (थोडे ग्राम्य) उदाहरण देतो.

सूत्रधार व विदूषक यांचा संवाद चालू आहे.

विदूषक : तुम्ही कोण ?

सूत्रधार : या देहास सूत्रधार म्हणतात.

विदूषक : काय सूत्रधार? म्हणजे सुताची धार? विळ्याला धार, कोयत्याला धार असे ऐकले होते. परंतु सुताची कसली धार ? एक वेळ मुताची धार म्हटलेत तर ठीक आहे !

बाकी, सामासिक विनोदनिर्मितीचा हा मोह भल्याभल्यांनाही होतोच. कोल्हटकरी कोटचा ऐकून, 'काय हा बुद्धीचा अपव्यय !' असा शेरा मारणारे लोकमान्य टिळक सुद्धा, 'ज्याचा सल्ला ऐकताच ऐकणारा गार पडतो, तो सल्लागार !' – असे लिहून जातातच.

---

१ या इंग्रजी वाक्प्रचाराचा अर्थ शय्येवर पत्नीने ऐकवलेले लेक्चर. पूर्वी शय्येभोवती पडदे असत त्या काळात उत्पन्न झालेला हा वाक्प्रचार आहे. –सं.

माझे एक मित्र आहेत. ते हा सामासिक उद्योग मुद्दाम करीत असतात. एका शाळेत पूर्वी आम्ही एकच काम करीत होतो. आमच्या हेडमास्तरांचा उल्लेख ते नेहमी ‘ डोके मास्तर ’ असा करीत. त्यांचे आडनाव होते ‘ देव ’. म्हणून त्यांचे बोलावणे आले की हे म्हणत, ‘ देवाज्ञा झाली. ’ मुलांची चित्रकला पाहून हे विचारीत, ‘ कुत्र कला ? ’, संक्रांतीच्या तिळगुळाला ते ‘ तिलोत्तमा ’ म्हणतात. एका पार्टीमध्ये खाद्यपदार्थांत गुलाबजाम होते. हे म्हणाले, ‘ या स्वादुर्पिडांबरोबर काही-तरी तिखटमिठाचा पदार्थ हवा. ’ त्यांचे हे असले बोलणे नेहमीच हसण्यावारी नेले जाई. परंतु एकदा ही सवय त्यांच्या अंगाशी आली. महिन्याचा शेवटचा दिवस होता. कॅटलॉग पूर्ण करण्याचे काम चालू होते. ज्यांच्याकडे वर्गशिक्षकाचे काम नव्हते ते दुसऱ्यांना मदत करीत होते. आमच्यातील एक बाई जरा गडबड घोटाळा करणाऱ्या होत्या. त्यांच्याकडे म्हणूनच कॅटलॉग दिलेला नव्हता. त्यांची मदतही कुणी घेत नव्हते. पण त्यांना काही स्वस्थ बसवेना. प्रत्येकाच्या टेबलाशी जाऊन त्या म्हणू लागल्या, ‘ मला काहीतरी काम सांगा ना ’ यावर आमच्या मित्रवर्यांना सामासिक हुक्की आली. त्यांनी गंभीरपणे विचारले, ‘ बाई, तुम्ही एवढ्या का वरं कामातुर झालात ? ’

यावर बाई भडकल्या नसत्या तरच नवल. त्यांनी हेडमास्तरांकडे तक्रार केली. थोड्याच वेळात आमच्या मित्रवर्यांना डोके मास्तरांची देवाज्ञा झाली. आता काय होते, म्हणून आम्ही काळजीत होतो; पण आमचे मित्रवर्य हसतच परत आले. आम्ही विचारताच ते म्हणाले, “ बघा; मी वाटेल ते बोलतो, म्हणून तुम्ही रागावता. पण आता डोके मास्तरांनी मला काय सांगावे ? ते म्हणाले, मास्तर, ही समास जोडण्या-फोडण्याची भलती सवय टाकून द्या. नाहीतर उद्या, बाजारात भाजी विकत बसलेल्या माळणीला तुम्ही बाजारबसवी म्हणाल तर ती चप्पल हाती घेईल.”

आता यावर आम्ही काय बोलणार ?

आमचे शास्त्रीबुवाही या मित्रवर्यांसारखेच. पूर्वी ते पुण्याला होते.

हल्ली आमच्या चौल गावामध्ये स्थायिक झाले आहेत. एकदा मी काहीतरी वाचीत बसलो होतो. तो हे आले. अंगवस्त्र (म्हणजे उपरणे, ही त्यांचीच समासोक्ती) सावरीत बसले, म्हणाले, ‘ काय मास्तर, वाचताना तुम्हाला **उपनयन** लागत नाही वाटतं ? ’ चष्म्याची अशी मुंज लावलेली पाहून मला हसूच आले. मी म्हटले, ‘ शास्त्रीबोवा, **उपनेत्र** म्हणा. उपनयन काय म्हणता ? ’ गांभीर्याचा आव आणून शास्त्रीबुवांनी अमर म्हटला—

‘ लोचनं नयनं नेत्रं ईक्षणं चक्षुरक्षिणी ’ त्यावर मी म्हणालो, ‘ पण उपनयन शब्दाची फोड वेगळ्या प्रकारे करण्याची रूढी आहे ना ? ’

‘ मास्तरसाहेब ! तुम्ही रूढीची तरफदारी करावी हे विलक्षणच ! ’

भाषाया रूढबलायसा ! तुम्हाला महाब्राह्मण म्हणून चालेल का ? चालत असेल तर म्हणतो, शास्त्रीबुवा महायात्रेहून आले. महाभोजन करून महानिद्रा घेत आहेत ! ... चालेल ?'

यावर शास्त्रीबुवा प्रथम काहीच बोलले नाहीत. मग थोड्या वेळाने आपले शिरोभूषण अंकस्थ करून आपल्या श्मश्रुमंडित डोक्यावर हात फिरवीत ते म्हणाले,

'आज तुम्ही आमचे चांगलेच **चौलकर्म** केलेत !'

आमच्या गावाच्या चौल या नावावरची शास्त्रीबुवांची ही नेहमीची कोटी होती.

**चौल, जिल्हा रायगड ४०२ २०३**

--आयुष्य म्हणजे अडचणींचं एक जाळं आहे आणि अडचणींना अजिबात महत्त्व न देणं हा त्याच्यावर मात करण्याचा एकच एक मंत्र आहे– व्यवहार-चतुर अशा पंडितांच्या अनेक पिढ्यांनी सिद्ध केलेला.

--आपत्तीच्या काळी उपयोगी पडेल अशी 'आपद्धर्म' नावाची हातचलाखी लोकांच्या संग्रही असते.

--अतिशय चांगल्या कल्पना (व्यावहारिक दृष्टचा) अतिशय मूर्खपणाच्या असतात. पण त्यांचा विचार करीत राहाणं हेच शहाणपणाचं असतं.

--सत्यानं आपला गोंडस चेहरा दाखवला म्हणजे सारं काही त्याला प्राप्त होतं, असं आपण समजता काय ? सामर्थ्याचा पाठिंबा नसेल तर सत्याला कोणीही विचारत नाही.

--जीवताचा जुगार केल्याशिवाय आपण जिवंत आहोत हे चांगलं जाणवत नाही.

--परकीय देश काबीज करणाऱ्या शहाण्या सत्तेनं तेथील लोकांना भरडून काढू नये, त्यांना भ्रष्ट करावं, शत्रूचं मन निराशेनं किंवा अपमानानं जखमी होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. त्यामुळे त्यांचं सामर्थ्य वाढत जातं. सौम्यपणानं राजकारण जास्त चांगलं साधतं. पौरुष पोखरून काढतं ते.

--माणसानं काहीही करावं. पण कशाच्याही आहारी जाऊ नये.

बेकेट – ज्याँ अनुई (अनुवाद– वि. वा. शिरवाडकर)

# बदलती नाती आणि भाषेचा शोध

मॅक्सीन बर्नसन

" ह्या माझ्या मिसेस्, " " हे माझे मिस्टर " असे धेडगुजरी वाकप्रचार ऐकून पूर्वी मला जरा खटकत असे. मराठीत " नवरा " आणि " वायको " ह्या नात्यांना इतके शब्द असताना ह्यां लोकांना इंग्रजी वापरण्याची काय जरूर आहे ? त्यात आपल्याला थोडे फार इंग्रजी येते हे दाखवण्याचा उद्देश, ह्यापलिकडे काही नाही. असे वाटत असे. मात्र ती बाब तितकी सोपी नसून ह्या वाकप्रचारात सध्याच्या भारतीय भाषांविषयक एक महत्त्वाची प्रक्रिया दिसून येत असेल, अशी शंका मला वाटायला लागली आहे.

वरील वाक्याचा विचार करायच्या आधी आणखी एक उदाहरण पाहू. माझ्या एका प्राध्यापक मित्राची भाषा कन्नड. त्याच्याच विभागात आणखी एक कन्नडभाषिक प्राध्यापक असतात. मात्र हे दोघेजण भेटले तर ते नेहमी एकमेकाशी इंग्रजीतच बोलतात. असें का, मी विचारले. त्यावर मित्र म्हणाला की आम्ही कन्नडमध्ये बोलला तर आमचा संबंध नेमका काय आहे हे ठरवावे लागेल. आदरार्थी वापरणं हे फारच औपचारिक वाटतं, आणि अरेतुरे वापरण्याइतकी आमची जवळीक नाही. हे ऐकून प्रथम माझी अशी कल्पना होती की, इंग्रजी वापरल्याने त्या दोघांचे नाते थोडेसे मोघम ठेवता येत होते. पण आता मला असें वाटते की, त्यांच्या नात्यामध्ये अजिबात संदिग्धता नव्हती—त्यांचे नाते म्हणजे सहकारी. अडचण अशी होती की सहकारी हें आधुनिक नाते असल्याने ते दर्शवण्यासाठी अहोजाहो आणि अरेतुरे ह्याच्या मधल्या भागी असणारी भाषिक पातळी हवी होती. कन्नडमध्ये त्यांना ही पातळी सापडली नाही म्हणून इंग्रजीचा आश्रय घ्यावा लागला.

आता " मिस्टर " आणि " मिसेस " ह्या शब्दाचा विचार करू. " ही माझी बायको " किंवा " हा माझा नवरा " असे म्हणण्याचे धाडस अगदी सुशिक्षित पुढारलेले (किंवा एकदम अडाणी) लोक करतील. " पत्नी " आणि " यजमान " हे शब्द मात्र जादा औपचारिक वाटतात, आणि " माणसे ", " मंडळी ", " कारभारी ", " कारभारीण " हे शब्द आजकाल फार जुने झाले. आम्हा नवरा—बायकोचा संबध आधुनिकतेच्या दिशेने होत चालला आहे पण ह्या सुधारणेमध्ये आम्ही मर्यादाही राखलेली आहे, हे तर " मिस्टर " आणि " मिसेस " ह्या शब्दाच्या

वापराने सुलभतेने सूचित केलेले नाही ?

आणखी एक उदाहरण. मराठीत जास्त करून आपण एखाद्या माणसाचे नुसते स्वत:चे नाव वापरले तर आपण त्याला एकेरी संबोधन करतो. काही वेळा मात्र नावाबरोबरं आदरार्थी संबोधन करणे जास्त उचित वाटते. उदाहरणार्थ, काही मैत्रिणींच्या नवऱ्याशी बोलत असताना मी नावाने हाका मारत असले तरी आदरार्थी सर्वनामे वापरते. इतरजणही असे करत असतील अशी माझी खात्री आहे.

एका दृष्टिकोनातून ही तीन उदाहरणे अगदी भिन्न आहेत. एकामध्ये मराठी बोलताना इंग्रजी शब्द वापरले जातात, दुसऱ्यामध्ये भारतीय भाषेचा वापर टाळून इंग्रजी वापरले जाते, तिसऱ्यामध्ये एखाद्या व्यक्तीला हाक मारताना कुठले सर्वनाम निवडायचे ह्याबाबतचा नियम बदलला गेला आहे. मात्र ह्या तीनही उदाहरणांमध्ये एक समान सूत्र आहे ते म्हणजे मराठीमध्ये (आणि सर्वच आधुनिक भारतीय भाषांमध्ये) एक विशिष्ट समाजरचना, माणसामाणसांमध्ये विशिष्ट संबंध अभिप्रेत असतात. आधुनिक काळामध्ये समाजरचनेत बरीच उलथापालथ होत असून, जुन्या नात्यामध्ये बदल झाले आहेत, आणि काही पूर्णपणे नवीन नातीही निर्माण झाली आहेत. ही बदलती नाती भाषेच्या द्वारे व्यक्त करण्याची धडपड कळत नकळत लोक करीत असतात. परकीय भाषेतले शब्द वापरणे, संपूर्णपणे परकीय भाषेत बोलणे, मातृभाषेतल्या व्याकरणाचे नियम बदलणे, ह्या वेगवेगळ्या भाषिक साधनांनी ह्या बदलत्या नात्यामधल्या बारीक छटाही दाखवता येतात. निदान त्या तशा दाखवल्या जातात.

**टपालपेटी ४०, फलटण ४१५ ५२३**

कादंबरीलेखनाला कलेची पदवी केव्हा मिळते ? की जेव्हा कादंबरीकाराला वाटू लागते की आपल्याला आपली गोष्ट सांगायची नसून दाखवायची आहे, अशी प्रदर्शित करायची की ती गोष्ट आपसूक सांगितली जाईल.

**पर्सी लबक, द क्राफ्ट ऑव्ह फिक्शन,** लंडन १९२१, पृ. ६२

# आस्तिक–नास्तिक

प्रदीप प्र. गोखले

आस्तिक आणि नास्तिक हे शब्द मराठी, इंग्रजी, हिंदी व अन्य आधुनिक भारतीय भाषांमध्ये सर्रास अनुक्रमे ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवणारी व न ठेवणारी व्यक्ती या अर्थाने वापरले जातात. पण मूळ संस्कृतात ते या अर्थाने रूढ नव्हते. अर्थात संस्कृतातही 'आस्तिक'चा शब्दशः अर्थ 'आहे' अशी ज्याची बुद्धी आहे तो व 'नास्तिक'चा अर्थ 'नाही' अशी ज्याची बुद्धी आहे तो असा होतो. (पाणिनीचे सूत्रच आहे 'अस्ति नास्ति दिष्टं मतिः') या व्युत्पत्त्यर्थाला अनुसरून काही वेळा आस्तिक, नास्तिक या शब्दांचा अर्थ विविध संदर्भांना लागू केला गेला आहे. उदाहरणार्थ– मनस्मृतीचा भाष्यकार मेधातिथी याने मनूने वापरलेल्या नास्तिक या शब्दाचे स्पष्टीकरण 'नास्ति दत्तं, नास्ति हुतं, नास्ति परलोकः' (दानात अर्थ नाही, यज्ञात आहुती देण्यात अर्थ नाही, परलोक अस्तित्वात नाही असे मानणारा) या शब्दात केले आहे. पण आस्तिक व नास्तिक शब्दांचे त्यातल्या त्यात रूढ अर्थ मात्र वेदप्रामाण्यबुद्धीशी संबंधित आहेत. त्यानुसार वेद प्रमाण आहेत अशी ज्याची बुद्धी आहे तो आस्तिक व वेद प्रमाण नाहीत अशी ज्याची बुद्धी आहे तो नास्तिक असा आस्तिक व नास्तिक शब्दांचा अर्थ होतो. पण बऱ्याचदा आपण वेद प्रमाण मानणे म्हटले की ईश्वर मानणे आलेच असे समजतो व आस्तिक–नास्तिक या शब्दांच्या प्राचीन अर्थात व मराठीतील रूढ अर्थात फरक करीत नाही. पण हा फरक समजून घेणे अगत्याचे आहे.

प्राचीन भारतात जी दर्शने उदयाला आली, त्यांचे वर्गीकरण आस्तिक (वेदप्रामाण्य मानणारी) दर्शने व नास्तिक (वेदप्रामाण्य नाकारणारी) दर्शने असे केले जाते. मुख्यतः सहा दर्शने आस्तिक दर्शने म्हणून ओळखली जातात– न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा (वेदांत). पैकी न्याय व वैशेषिक दर्शन हे अगदी पहिल्यापासून ईश्वरवादी होते की ईश्वरवाद त्यात पुढे घुसडण्यात आला? हा प्रश्न आजही विद्वानांमध्ये चर्चिला जात असतो. (मात्र या दोन दर्शनातील सूत्रवाङ्मयानंतर निर्माण झालेल्या भाष्य-वार्तिक-वाङ्मयात ईश्वरवादी भूमिका घेतली गेली हे निर्विवाद आहे.) सांख्य व योग या जोडगोळीपैकी योगदर्शन हे ईश्वरवादी मानले जाते. पण कपिलाचे सांख्य दर्शन या नावाने जे दर्शन प्रसिद्ध

आहे, त्यात परलोक, पुनर्जन्म व ब्रह्मदेवापासून विविध देवदेवतांचे अस्तित्व मानले आहे असे एक वेळ दाखविता येईल. पण जग निर्माण करणारा परमेश्वर त्या दर्शनाने मानलेला नाही. ब्रह्मदेव धरून सगळ्या देवदेवता या दर्शनानुसार सृष्टीला कारण नव्हते तर या सृष्टीचा भागच ठरतात. तर उदासीन पुरुषाला उद्देशून सृष्टीचा पसारा स्वतःमधून अभिव्यक्त करणारी जडप्रकृती ही सृष्टीचे मूळ कारण ठरते. तेव्हा सांख्यदर्शन हे आस्तिक (वेदप्रामाण्यवादी) आहे पण तरीही निरीश्वर-वादी आहे. तीच गोष्ट पूर्वमीमांसा दर्शनाच्या बाबतीतही खरी आहे. वेदातील कर्मकांडाचे (कर्मप्रतिपादक वेदभागाचे) स्पष्टीकरण हे तर पूर्वमीमांसादर्शनाचे मुख्य काम आहे. (या दर्शनाला कधी कधी मीमांसादर्शन एवढेच नाव वापरतात.) पूर्वमीमांसादर्शनात वेद स्वतःप्रमाण मानले आहेत. म्हणजेच वेदांचे प्रामाण्य अन्य कोणत्याही प्रमाणावर अवलंबून नाही असे मानले आहे. या अर्थाने पूर्वमीमांसादर्शन कट्टर आस्तिक दर्शन मानता येईल. पण हेच पूर्वमीमांसादर्शन पक्के निरीश्वरवादी आहे. या दर्शनानुसार जीवांच्या अनादी कर्मामुळे ही सृष्टी अनादी काळापासून पुन्हा पुन्हा उत्पन्न होत आली आहे व सृष्टीचे हे चक्र अनंत काळपर्यंत चालू राह-णार आहे. या सृष्टीचा नियम तसेच ऐहिक व पारलौकिक श्रेय मिळविण्याचा मार्ग सांगणारे वेदही अनादी आहेत. पण सृष्टीही तशीच अनादी असल्याने तिला निर्माण करणारा, तसेच वेदांचे प्रतिपादन करणारा कोणी ईश्वर नाही असे या दर्शनाचे मत.

आस्तिक दर्शनांपैकी राहाता राहिले उत्तरमीमांसादर्शन. उत्तरमीमांसादर्शन म्हणजेच वेदांतदर्शन. म्हणजेच उपनिषदे या वेदवाङ्मयाच्या शेवटच्या भागातील (वेदांतामधील) विचारांचे स्पष्टीकरण व समर्थन करणारे तत्त्वज्ञान. उपनिषदांच्या वेगवेगळ्या स्पष्टीकरणांनुसार यात शुद्ध अद्वैतापासून शुद्ध द्वैतापर्यंत विविध संप्र-दाय उत्पन्न झाले. त्यांतील बहुतेक संप्रदाय जरी ईश्वरवादी असले तरी सगळ्यात प्रसिद्ध संप्रदाय जो शंकराचार्यांचा अद्वैतसंप्रदाय, तो काटेकोर अर्थाने ईश्वरवादी नाही. कारण त्यात जगाचे ब्रह्म हे कारण मानले असून ब्रह्म हे 'कारण' असले तरी तो 'कर्ता' नाही. विश्वनिर्माता ईश्वर हे ब्रह्माचे वास्तविक रूप नसून ते ब्रह्मावर आपण आरोपित करत असलेले रूप आहे तसे त्यात मानले जाते. पूर्व-मीमांसा व उत्तरमीमांसा यांच्यातील ठळक फरक म्हणजे पूर्वमीमांसा वेदाच्या पूर्वभागाचे (मंत्र व ब्राह्मण) स्पष्टीकरण व समर्थन करण्यावर भर देते तर उत्तरमीमांसेचा भर उत्तरभागावर–उपनिषदांवर आहे. पण वेदप्रामाण्याच्या भूमिकेत दोघांपैकी कोणी कसूर करीत नाही.

अशा रीतीने वेदप्रामाण्यवादी ('आस्तिक') असणे आणि ईश्वरवादी असणे यात तसा काही अनिवार्य संबंध नाही. विशेषतः प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाविषयी लिहीत-बोलत असताना आस्तिक व नास्तिक या शब्दांचे मराठीतील रूढार्थ व

प्राचीन संस्कृत वाङ्मयातील रूढार्थ यांच्यातील फरकाचे भान ठेवणे आवश्यक आहे.

एकंदरीत आस्तिक व नास्तिक या शब्दांचे रूढार्थ भारतात इतिहासाबरोबर बदलत गेले हे निश्चित. ते का बदलत गेले असावेत हा भाषाविज्ञान व सामाजिक सांस्कृतिक, वैचारिक इतिहास यांचा संयुक्त विषय आहे. या विषयांचा माझा अभ्यास नाही. पण अभ्यासकांनी यावर अधिक प्रकाश टाकावा या हेतूने काही शक्यता सुचवायला हरकत नसावी.

आस्तिक वा नास्तिक असे लेबल एखाद्या व्यक्तीला किंवा विचारसरणीला लावणे म्हणजे त्या व्यक्तीचे किंवा विचारसरणीचे केवळ वर्णन करणे नव्हते तर त्याविषयी अनुक्रमे अनुकूल व प्रतिकूल अभिप्राय व्यक्त करणेही ठरत होते. कारण आस्तिक असणे म्हणजे पर्यायाने परंपरागत सांस्कृतिक मूल्यांची चौकट मान्य करणे होते. प्राचीन भारताची सांस्कृतिक परंपरा ही मोठ्या प्रमाणावर वर्ण–जाती, आश्रम, यज्ञसंस्था, परलोकवाद यांच्या चौकटीने निश्चित झाली होती. या चौकटीचे समर्थन वेद व स्मृतिवाङ्मयाद्वारा होत होते. त्यामुळे वेदप्रामाण्य व ओघाने येणारे स्मृतिप्रामाण्य हे परंपरासमर्थनाचे विविध संप्रदायांना जोडणारे माध्यम होते. बौद्ध व जैन संप्रदायांची वर्ण–जाती, आश्रम, यज्ञसंस्था, व परलोकवाद यांच्या परंपरागत चौकटीला फारशी मान्यता नव्हती, निदान काही प्रमाणात विरोधच होता. (उदाहरणार्थ, जन्मजात वर्णव्यवस्था, ब्राह्मणवर्चस्व, यज्ञाचे कर्मकांड, यज्ञाच्या निमित्ताने होणारी हिंसा यांना त्यांचा विरोध होता.) त्यामुळे बौद्ध व जैन संप्रदाय हे वैदिक संप्रदायांच्या दृष्टीने नास्तिक ठरणे हे या सामाजिक–सांस्कृतिक पार्श्वभूमीवर समजून घ्यावे लागेल.

पण बौद्ध, जैन, व चार्वाक संप्रदाय वगळता श्रुतिस्मृतींचे प्रामाण्य जरी भारतातील संप्रदायांना मोठ्या प्रमाणावर मान्य होते, तरी या संप्रदायांना कालांतराने वर्णजाति–परलोकवाद इत्यादींनी बद्ध अशी परंपरागत चौकट टिकविण्यासाठी सामायिक माध्यम म्हणून त्यांची गरज उरली नसावी. ईश्वरावरील श्रद्धेचे सुटसुटीत माध्यम हळूहळू सर्वमान्य झाले असावे.

म्हणजेच काय काय घडले असावे ?

(१) निरीश्वर सांख्य संप्रदायाची लोकप्रियता नाहीशी झाली.

(२) पूर्वमीमांसा दर्शनही स्वतंत्र निरीश्वरवादी दर्शन म्हणून पुरस्कारणारे कोणी राहिले नाहीत. तर ईश्वरवादी चौकटीत पूर्वमीमांसेचे कर्मकांड पुरस्कारले जाऊ लागले.

(३) न्याय–वैशेषिक ही दर्शनांची जोडगोळी नतरच्या काळात तरी कट्टर ईश्वरवादी दर्शन म्हणून पुढे आली व याबाबतीत द्वैतवेदांत्यांनी त्यांच्या ईश्वरविषयक युक्तिवादांचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

(४) अद्वैतवेदांतात काटेकोर अर्थाने ईश्वरवाद नसला तरी व्यावहारिक सत्तेच्या अनुरोधाने त्यातही ईश्वरवाद व त्याच्याशी निगडित भक्तिमार्ग मान्य केला गेला. (सत्ता याचा इथे अस्तित्व हा अर्थ आहे.)

(५) विविध भक्तिप्रधान द्वैती संप्रदायांचा जनसामान्यांमध्ये प्रसार झाला.

(६) अशा रीतीने एकीकडे श्रुतिस्मृतींचे प्रामाण्य आणि ईश्वरवाद यांच्यातील व्यवहारातील अंतर खूपच कमी झाले, तर दुसरीकडे बौद्ध संप्रदाय भारतात राहिला नाही तर जैन संप्रदायाने इथल्या वैदिक परंपरेशी तर मिळतेजुळते घेतलेच (उदाहरणार्थ जातिव्यवस्था मानली पण तत्त्वतः नाही, तरी व्यवहारतः) महावीराला ईश्वराचेच स्थान दिले.

थोडक्यात तथाकथित हिंदू संस्कृतीने जो एकात्म चेहरा सुरुवातीला वेदप्रामाण्याच्या आरशात पाहिला, तो तिने ईश्वरवादाच्या आरशात पहायला सुरुवात केली.

(७) त्यात भर म्हणून मुस्लिम समाजात व ख्रिश्चन समाजात परंपरासमर्थनाचे सर्वसंमत माध्यम ईश्वरवाद व ईश्वरोक्त पवित्र ग्रंथ असल्यामुळे त्या संस्कृतीच्या प्रभावाखाली भारतीयांनीही ईश्वरवादी / निरीश्वरवादी हे कल्पनाद्वंद्व परंपरासमर्थनासाठी महत्त्वाचे ठरविले व आस्तिक, नास्तिक या सुटसुटीत व बहुप्रचलित शब्दांना अनुक्रमे ईश्वरवादी व निरीश्वरवादी हेच अर्थ मुक्रर केले.

वरील स्पष्टीकरण अपुरे आहे व काही प्रमाणात ते चूकही असू शकेल. पण अभ्यासकांनी त्यावर अधिक प्रकाश टाकावा म्हणून ते समोर ठेवले आहे.

**तत्त्वज्ञानविभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७**

– ज्ञान मिळवायचे असेल तर वाचनाला पर्याय नाही. पण वाचन हे विचार करण्याचा पर्याय होऊ शकत नाही.

– डॉ. रा. ना. दांडेकर

पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागात दिलेल्या व्याख्यानातून

# व्यक्तिमत्त्व शब्दांचे

शरदिनी मोहिते

अचानकच एका गोष्टीची गंमत ध्यानात आली. तिला गमतीची गोष्ट म्हटलं तरी फारसं काही बिघडणार नाही. त्याचं असं झालं, की ताटात पुन्हा मुगाची उसळ आलेली बघून आमच्या निखिलनं खूप त्रागा करून घेतला. चिडला चिडला तो आणि एकदम भोकाड पसरलं केवढं तरी मोठं! किती समजूत घातली पण उपयोग झाला नाही. 'अरे बाबा, झालं तरी काय एवढं रडायला?' म्हणून अनेकदा विचारून झाल्यावर एकदाची त्याला उत्तर द्यायला सवड झाली आणि त्यानं जाहीरनामा घोषित केला, 'आता पुन्हा म्हणून जर मुगाचं काही मला जेवायला वाढशील ना आई, तर मी जेवायचंच बंद करीन.'

एवढ्या मोठ्या रड्याचं हे 'एवढं मोठं' कारण पाहून हसावं की रडावं हेच समजेना मला. 'आ' वासून निखिलकडे पहात राहिले मी. तर तोच पुन्हा म्हणाला, 'बघ हं आई, खरंच सांगतोय मी. पुन्हा पुन्हा मूग शिजवून मला चिडवशील तर माझ्यासारखं वांड कोणी असणार नाही...'

नाही म्हटलं तरी रागच आला मला त्याच्या या धमकावणीचा. चांगल्या दोन चार मुस्कटात भडकावून दिल्या असत्या एरवी मी त्याच्या, परंतु माझ्या अंतःकरणात कुठं तरी जाणवून गेलं की त्याची तक्रार मनापासूनची आहे. अगदी घायाळ होऊन, तळमळून तो पोटतिडिकीनं बोलतो आहे. त्याच्या 'दुःखा'च्या प्रामाणिकपणाचा संशय घ्यावा असं काही मला वाटेना. कारण तरी काय असावं यामागचं, म्हणून मी उत्सुकतेनंच विचारलं,

'का रे?'

'मूग ही काय वस्तू आहे?'

'मग काय आहे?'

'वस्तू आहे, पण काय खाण्याची वस्तू आहे?'

'म्हणजे रे काय? सारी जणं खातात. आवडीनं खातात.'

'खाणारी कशी खातात कोण जाणे!... किती उग्र वास असतो त्याचा.'

'अरे, काही जणांना तो वासच आवडतो...'

'धन्य आहे!'

'कडधान्ये असावीत बाळा खाण्यात.'

'असावीत ना. पण आपल्या घराचा खाक्या असा की कोणी जर पाहील, तर म्हणेल जगात मूग हे एकच एक कडधान्य आहे... खरं सांगू आई, तू मुगाचं काही जरी केलंस ना तरी मला रडावंसं वाटतं.'

'ते दिसतंच आहे. आता तू तोच कार्यक्रम केलास. शोभलं नाही रे तुला? चांगला आठवीतला मुलगा, नि कुकुल्या बाळाप्रमाणे गळा काढतो आहे!'

'पण आई...'

'सगळं समजलं.'

'मूग पाहिले की माझी खाण्यावरची वासनाच उडते.'

'अरे पण आपल्या घरात तर इतर सर्वांना आवडतात मूग.'

'हेच ते. काय शब्द पण शब्द आहे. वस्तू भयानक. नावही भयानक. 'मूग गिळून स्वस्थ बसा' याइतकी भयानक धमकी जगात दुसरी कोणती असेल, असं मला नाही वाटत. मूग...म्हणे मू ग. 'म'ला दुसरा उकार. पहिला उकार असूनही भागत नाही... दुसरा उकारच हवा. खरं काहे. त्याशिवाय पुरेपूर भयानकता येणार कशी? आई, मूग म्हटल्यावर मला चक्क जोशी मास्तर आठवतात ग. बुटके, गोबऱ्या गालाचे, फोडेल्या तोंडाचे. शुद्धलेखन समजावताना, दीर्घ उकार सांगणार तो मूग हा शब्द घेऊनच. मू ग असं जेव्हा म्हणायचे तेव्हा त्यांचे डोळे वटारल्याप्रमाणे मोठे व्हायचे. त्यातही डावी भुवई एखाद्या व्हिलनप्रमाणे वाकडी व्हायची. उंचावलेल्या त्या भुवईवरच्या बाजूला असलेला मोठा चामखीळ बटबटीत व्हायचा आणि त्यामुळे तो दीर्घ उकार दाखवण्यासाठी ओठांनी केलेला अन् बराच वेळ टिकणारा चंबू इतका ओंगळवाणा दिसायचा की मळमळून यायचं... आई, करत जा तू मूग. पण मला कधी वाढू नकोस... एवढे उपकार कर माझ्यावर... पाया पडतो मी तुझ्या...'

निखिलबाबत दयावंत होऊन मुगापासून त्याला सूट द्यायच मी ठरवलं खरं, पण मुगानं माझी पाठ काही सोडली नाही... एवढासा हा दोन अक्षरी शब्द पण त्याच्यात एवढी मोठी करामत असेल असं नव्हतं वाटत कधी. मुगातला दीर्घ उकार एवढा पराक्रम– निखिलवर परिणाम करण्याचाच का होईना– करत असेल असं नव्हतं वाटलं कधी. म् आणि ग् ही दोन व्यंजनं, अ ऊ अ असे हे स्वर इतका धुमाकूळ आमच्या घरात घालू शकतात हे म्हटल्यावर मी अशीच आणखी काही गंमत कुठे सापडते का म्हणून विचार करून पाहू लागले, तर माझ्या बाल-मैत्रिणीचा, कुंदाचा आवाज माझ्या कानात घुमू लागला, 'शी! कसा बाई हा पदार्थ खाता तुम्ही...? म्हणजे मला तर बाई मटकी म्हटलं की पटकी आठवते!'

कोणता शब्द ऐकून कोणाच्या मनात काय विचार येतील, काय कल्पना उभ्या

रहातील याचा नियम नाही ! 'प्रत्येक शब्द ऐकणाऱ्याच्या मनात वस्तुकल्पना किंवा चित्रकल्पना चितारून जात असतो. आताच पहाना चितारून म्हणताना विनाकारणच पिसारा शब्द आठवतो आणि मोराच्या पिसाऱ्याच ऐश्वर्य तर नजरेपुढे उभं राहिलंच, पण निसर्गातलं आणखीही किती तरी वस्तूंचं, दृश्यांचं ऐश्वर्य नजरेसमोर नाचतं .. खुद्द ऐश्वर्य म्हटल्यावर असं काही सुखावणं होतं की आपणच सकल-ऐश्वर्यसंपन्न असल्याचा भास होतो. त्यामुळेच नेपाळच्या राणीच नाव ऐकून खूष व्हायला होतं. वाटतं, राणीचं नाव असावं तर असं, असं आणि असंच... ऐश्वर्या-देवी ! वा ! काय नाव आहे ! ! खूष होणं हा एक भाग, तर विचित्र वाटल्यानं अस्वस्थ होणं हा वेगळाच भाग. हेच पहाना—आमच्या निखिलचं नाव ऐकून आमची एक शेजारीण म्हटली होती, ' असऽं कसलं हो नाव ठेवलं तुम्ही मुलाचं ? निखिल म्हटलं की काही तरी निखळल्यासारखं वाटतं. ' मी मनात म्हटलं निखळत असेल तुझी बत्तिशी !

शब्दांचा जन्मच मुळी मनातल्या कल्पनांना आकार देण्यासाठी झालेला आहे. आपल्या मनातल्या कल्पना आणि भावना दुसऱ्यांपर्यंत पोचवण्यासाठी आपण शब्दांचा वापर करतो. आपल्याला जे म्हणायचं ते त्या शब्दांतून ऐकणाऱ्याला जाणवलं पाहिजे. तीच कल्पना, तीच भावना त्या शब्दाच्या रूपानं प्रमाणभूत असा-यला हवी. थोड्या वेगळ्या शब्दात हेच सांगायचं म्हणजे शब्द आणि अर्थ यांच्या समीकरणाबाबत अलिखित का होईना, करार असायला हवा. तसा तो असतोच. भाषेच्या मूलभूत गोष्टींपैकी ही एक आहे.

भाषेतील शब्दांपैकी बहुसंख्य शब्द ही गोष्ट इमानेइतबारे पार पाडतात. एकच गोष्ट बोलून दाखविण्यासाठी जगभर निरनिराळ्या मानवगटांनी निरनिराळे शब्द वापरले असतील परंतु त्या त्या गटापुरती ती ती कामगिरी तो तो शब्द करतच असतो. एकच शब्द एखादी कल्पना साकार करत बसत नाही. एकेका भाषेत एकेका शब्दाला (सर्वच शब्दांना नेहमीच असतील हे खरे नव्हे. तरीही—)अनेक समानार्थी शब्द असू शकतात. तरीही हे शब्द आपली कामगिरी पार पाडतात. उदाहरणार्थ— ' हिंस्र ' हा शब्दच मुळी हिंस्रपणा मूर्तिमंत उभा करतो. यातले वर्ण, त्यांचा क्रम त्यांच्या उच्चारांचा एकूण परिणाम, अगदी नंबरी साधलंय रसायन.

त्याचप्रमाणे हेही शब्द पहा—बुळबुळीत, गिळगिळीत, मिळमिळीत, पुळपुळीत, तुळतुळीत... या ळ वाल्या शब्दातच आणखी काहींची गर्दी तुम्हाला आढळून येईल. चळवळ चळवळ्या, तळमळ, मळमळ, (या शेवटच्या शब्दात ळ ऐवजी ल टाकला की मात्र एकदम तलम वस्त्र हातात येईल हो — मलमल !) आणखी उदाहरणं पहा—उतरंड, घसरणे, निसरडी, लिबलिबीत, भीषण, भयाण, भेसूर, वात्रट, वटार-लेला, थप्पड, यौवन, राजस, सामर्थ्य, घट्ट, ढिला, मोटा, थोरला, गायब, नेभळा,

तेजस्वी, चमकदार, तेजाळ, जहाल, रिमझिम, झिमझिम, झिम्मड, धांदल, धावपळ, उज्वल, ज्वलंत, चक्क, मठ्ठा, चक्रम, बडबड, चक्कर, ज्वाला, धैर्यशील, टक्कर, व्याकूळ, मऊ, कठोर, चकचकाट, टकाटका, धडाधडा, मिचमिचीत, दणदणीत, ठणठणीत, ठणकावून, मधुर, मोहक, तलाव, सरोवर, गढूळ, नितळ, धबधबा, ढोल्या, ठोल्या, गडगंज, क्षूद्र, किडमा, किडकिडीत, गबदुल, ऐदी, गुटगुटीत, टणाटण, महान, विशाल, कुचंबणा, हेटाळणी, चुटपुट, वादंग, रणमर्द, धुमाकूळ, मस्तवाल, ठोकाठोक, धडाडधूम, स्फोट, केविलवाणा, भिजलेला, थिजलेला, वळण, वेटोळे, वाटोळा, भित्रा, घट्ट, जळमट, फुलोरा, जळफळाट, तडफड, निवांत, चिकट, चिवट, लाही, किटकिट, वळवळ, वलवल, पुटपुट, ठाणवंद, कुजट, उवग, भिकार, गळणे, गिळणे, गाळणे टपोरा, टवटवीत, देखणा, सुंदर...

शब्दसमुद्रातून मोती वेचायचे तरी किती ? हे थोडे नमुने आपण पाहिले ना ? यातल्या प्रत्येकानं आपल्याजवळ अशी काही अर्थपूर्णता बाळगलेली आहे की हे शब्द वाचताना किंवा ऐकताना देखील त्यामागील अर्थ दृश्यरूप धारण करून आपल्या मनाच्या पडद्यावर उमटून रहातो. चित्रपटातले देखावे पडद्यावर एकामागून एक येत रहावे, पहिले चित्र मावळून त्या जागी दुसरे चित्र उमटावे, असे होते. पटापट जरी वाचले किंवा म्हटले तरी पहिल्या शब्दाचे अर्थचित्र नाहीसे करून त्या जागी दुसरे समर्थ चित्र उभे करण्याची ताकद यातल्या प्रत्येक शब्दात आहे. यापैकी प्रत्येकाला विशिष्ट व्यक्तिमत्त्व प्राप्त झालेले आहे. ' देखण्या 'ला देखणेपण आहे, ' वाटोळा ' गरगरीत आहे. ' झिमझिम ' हलक्या वर्षावाने ओले करून सोडते, ' चकचकाट ' दिपवतो, ' ऐदी ' ' मठ्ठ ' यांची जातच सुस्त नि ढिम्म, ' तेजाळ ' तेजात न्हाऊ घालणार तर ' भेसूर ' अंगावर काटा उभा करणार, ' रणमर्द ' ' धैर्यशील ' आदर उत्पन्न करणार, ' मोहक ' मोह पाडणार, ' मधुर ' जीभ गोड करून टाकणार, ' गढूळ ' गढळून टाकणार, तर ' नितळ ' अगदी तळाचा ठाव दाखविणार... ' वात्रट ' काय, ' ढिला ' काय, एकेक शब्द एकेक चित्र उभे करणार... ' विशाल ' विस्ताराची आनंददायी भावना निर्माण करणार तर ' तलाव ' अगर ' सरोवर ' आपल्या नाजूक तरंगाच्या वर्तुळातून अवगाहनाचे आमंत्रण देणार. ' सुंदर ' तर काय सुंदरच. त्याचा अनुस्वार देखील एक वेगळेच सौंदर्य लेवून बसलेला आहे. बाळाच्या कपाळावरच्या किंवा गालावरच्या टिकलीसारखा हा सुंदर अनुस्वार ' सुंदर '...' सुंदर '...' सुंदर ' असे अनेक नाजूक पडसाद उमटवीत रहातो. मराठी माणसाला ' सुंदर ' म्हटल्यावर ' सुंदर ते ध्यान ' नकळतच आठवून जाते.

' ध्यान ' ही ' ध्यान 'च आहे. तुकारामाच्या अभंगातले विटेवरचे सुंदर ध्यान अनेकांच्या अंतःकरणातला भक्तिसागर उचंबळविण्यास समर्थ आहे. पण ' ध्यान 'ला

असलेला दुसरा चमत्कारिक अर्थ हास्यास्पद असे एखादे विदुषकी ध्यान नजरेपुढे उभे करून विनोद निर्माण करतो आहे.

याबाबत आणखी एक गोष्ट म्हणजे एखादा शब्द एखाद्या व्यक्तीच्या मनात जे एक अर्थचित्र निर्माण करेल तेच अर्थचित्र तोच शब्द दुसऱ्या व्यक्तीच्या मनात उभे करील अशी खात्री नाही. वेगळेच अर्थचित्र निर्माण होऊन कधी कधी गोंधळही निर्माण होतात. यासाठी शब्दातील वर्ण, त्यांचा क्रम, त्यांच्या उच्चारामध्ये, उच्चारणाऱ्या व्यक्तीगणिक होणारा नकळत घडणारा बदल, उच्चाराचे वेळी दिले जाणारे कमी अधिक आघात किंवा स्वरांची कमी अधिक लांबी, आवाजाचे चढ-उतार यातूनही वेगळेच अर्थचित्र निर्माण होण्याची पुष्कळशी शक्यता असते.

समजा, एका गोड मुलाचं नाव सतीश आहे. त्याची आई त्याला जरा मोठ्यानेच हाका मारते आहे. ऐकणाऱ्याला साहजिकच वाटणार की हाक मारताना आई दात-ओठ खाते आहे. इथे दोष बोलणाऱ्याचाही नाही, ऐकणाऱ्याचाही नाही. त्या शब्दाच्या घडणीचा दोष आहे. कारण यातल्या प्रत्येक अक्षराचा उच्चार दाताला जीभ लावूनच होत असतो !

कधी कधी गंमत होते. एकच वस्तू किंवा व्यक्तिविशेष दाखवणारे वेगवेगळे शब्द भाषेत असतात. हे वेगवेगळे शब्द त्याच वस्तूबद्दल किंवा व्यक्तिविशेषाबद्दल वेग-वेगळी अर्थचित्रे निर्माण करू शकतात. करतात ! आणि ही वेगवेगळी चित्र ज्याच्या त्याच्या मनाच्या ठेवणीनुसार किंवा पूर्वग्रहानुसार कधी कधी विनाकारण होत अस-लेल्या विक्षिप्त कल्पनेनुसार निर्माण होऊ शकतात. एकाच कल्पनेबद्दल वापरले जाणारे अनेक शब्द, यातला एकेक शब्द एकेकाच्या मनात काय काय चित्र चिता-रून जाईल...सहज गंमत म्हणून आपल्या परिचयाच्या लोकात चर्चा करायला काहीच हरकत नाही. आम्ही आमच्या चर्चा–मंडळात अशा प्रकारची चर्चा केली होती. ती फारच मनोरंजक झाली होती. एखाद्या शब्दाचे ध्यानीमनीही नसलेले कल्पनाचित्र, अर्थचित्र एकेका सदस्याकडून ऐकायला मिळाल्याने खूप गंमत वाटली. आश्चर्य वाटले, थक्कही व्हायला झाले. एकच उदाहरण वानगीदाखल : पती, नवरा पतिदेव, नाथ इत्यादी शब्दांचा विषय चर्चेला निघाला. चर्चामंडळातील स्त्रियां-कडून कल्पना भराभर उलगडल्या गेल्या. एकजण म्हणाला, नवरा म्हटलं ना, की भरगच्च सुवासिक फुलांच्या मुंडावळचा ल्यालेला, हसरा, मिस्किल चेहरा नजरेपुढे येतो.

दुसरी एक म्हणाली, नवरा म्हटल्यावर हळद लावल्याप्रमाणे असणाऱ्या सुवर्ण-कांतीचा हसतमुख, उमदा आणि सहानुभूतीनं विचार करणारा, समजूतदार जीवन-साथी असं काहीसं चित्र डोळ्यापुढे उभं रहातं. ही मतं ऐकल्यावर त्या दोघींच्या नशीबवान नवऱ्यांचं सगळ्यांनी टाळ्या पिटून हर्षध्वनियुक्त अभिनंदन केलं.

तेवढ्यात एकजण म्हणाली, 'नवरा म्हटलं की चोवीस तास हक्काची मोलकरीण बाळगणारा एखादा हुकूमशहा या नावानं ओळखला जात असावा असं वाटतं.'

सगळीकडे एकदम शांतता पसरली. या बाईच्या नवऱ्याचा श्वास एकदम वेगात सुरू झाला...त्यात दुसऱ्या एका बाईनं म्हटलं, 'नवरा हा असा प्राणी आहे की, ज्याला आपली बायको मोलकरीण असावी परंतु तिनं मोलकरणीप्रमाणे दिसू नये असं वाटत असतं.' मग अनेक श्वास जोरात चालू झाले. एक वीर चवताळून उठले म्हणाले, 'मग बायको म्हटल्यावर काय वाटतं सांगू का?'

तेव्हा त्या दिवशीच्या सभेचे अध्यक्ष म्हणाले, 'तो विचार नंतर व्हायचा आहे. तरी देखील सांगितल्यास हरकत नाही.'

मग उत्तर आलं. 'बायको म्हटल्यावर माझ्या नजरेसमोर शि. द. फडणीसांचं प्रसिद्ध चित्र नाचायला लागतं. दहा हातात दहा आयुधं—उदाहरणार्थ झारा, लाटणं इत्यादी घेतलेली 'गृहलक्ष्मी' का 'कडकलक्ष्मी' असं कोणतरी दिसतं मला बायको म्हटल्यावर.'

खूप हसले सारेजण यावर. पुन्हा मग पहिलाच विषय पुढे चालू झाला. तेव्हा एक स्त्री म्हणाली, 'पती म्हटलं की उगीचंच मला 'यती' ची आठवण होते आणि कपाळावर भस्माचे आडवे पट्टे ओढलेला चेहरा दिसायला लागतो.'

गंमतच वाटली साऱ्यांना. मग आणखी एक बाई म्हणाली, 'असं का वाटावं माझं मलाच आश्चर्य वाटतं. पण सांगायला हरकत नाही. पती म्हटल्यावर मला एक पाठमोरी बाई दिसायला लागते. ती बसलेली आहे, केस मोकळे, पदर एका खांद्यावर. तिच्या मोकळ्या केसातूनही पाठीचा थोडा भाग दिसतो आहे. त्या पाठीवरच्या चोळीचा खालचा काठ, त्यावर लावलेला चकाकणारा जरीचा काठ अशा गोष्टी दिसतात. खूप विचार केला की मग लक्षात येतं की हे दृश्य वटपौर्णिमेला भिंतीवर लावून पुजलं जात असलेल्या चित्रातल्या सावित्रीचं असतं. मग नंतर पुढच्या कल्पना तिच्या मांडीवर सत्यवानाचं डोकं आहे इत्यादी...पण गंमत वाटते ती ही की पती म्हटल्यावर एक अत्यंत निष्ठावान, पतीशी एकजीव होऊ गेलेली एक प्रेमळ आणि तडफदार पत्नी आठवते. पुरुष डोळ्यासमोर यायचा तर स्त्रीच येते!

या बोलण्यानं सगळ्यांनाच नवल वाटलं, करमणूकही झाली सर्वांची.

यानंतर एक गृहस्थ म्हणाले की, बायको म्हटल्यावर मला 'चमचमीत, खुसखुशीत असं काही वरचेवर करून आग्रहानं खाऊ घालणारी आणि आमचं पोट भरल्यावर स्वतःच तृप्त होणारी प्रेमळ स्त्री आठवते.'

मग एका स्त्रीनं मोठं नाजूकसाजूक आणि स्वतःला जाणवणारं आदर्श वाटणारं दृश्य वर्णन करून दाखवलं. ती म्हणाली, 'बायको किंवा नवरा यापैकी कोणाचाही

कुठल्याही भाषेत कुठल्याही शब्दानं कोणीही उल्लेख केला की माझ्या नजरेसमोर दोन प्रेमळ जीव उभे रहातात. एका स्वच्छ आणि सुंदर रस्त्याच्या कडेला एखादी छोटीशीच पण देखणी मोटार उभी आहे. गाडी थांबल्यावर ती चालवणारा ऐटदार आणि उमदा तरुण नवरा उतरला आहे आणि तत्परतेनं आपली बायको बसलेल्या बाजूच्या दाराकडे येऊन ते उघडत आपल्या नाजूक आणि गोड बायकोला हात देत खाली उतरायला तिला मदत करतो आहे. तीही त्याच्या या खुशीची दाद प्रसन्नपणानं हसून देते आहे. अस काहीसं अमेरिकन वळणाचं म्हणालात तरी हरकत नाही, मोहक नि सुखाचं दृश्य नजरेपुढं येतं.'

आणखीही कल्पना पुढे आल्या. एक गृहस्थ म्हणाले, 'बायको म्हटलं की पेशवेकाळातली खोपा घातलेली नथ, भोकरं, बुगड्या घातलेली, गळाभर नि हातभर दागिने घालून त्या भाराने लवलेली, चालतानाही पायीच्या जड साखळ्यांनी पावले भारावलेली, अकाली पोक्त दिसणारी स्त्री डोळ्यासमोर उभी रहाते. त्यामानाने पत्नी बरं चित्र उभे करते.'

मग एकजण पटकन म्हणाले, 'पत्नी म्हटले की, आपली कोणीतरी दृष्ट काढतंय असं वाटतं मला. 'प' नंतर पटकन येऊन जाणारा 'त्' त्याला जोडून 'न' आणि नंतरची दुसरी वेलांटी यांचा हा माझ्या मनावर असा परिणाम झाला.'

सर्वात थक्क करून सोडलं या गृहस्थांनी. शब्द आणि त्यानं उभं केलेलं चित्र यांचा इतका विलक्षण ताळमेळ या शब्दाच्या बाबतीत दुसरा कुठलाच नव्हता.

असंच आढळून येते यावरून की, शब्दात विशिष्ट क्रमानं येणारे स्वर आणि व्यंजनं, शब्दांची लांबी, तो उच्चारला जात असतानाची लकब या सगळ्यामुळे शब्दाला व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. आणि ते सुद्धा असे लवचिक की ऐकणाऱ्यागणिक या व्यक्तिमत्वानं वेगळाच आविष्कार दाखवून द्यावा.

आणि त्यातही गंमत अशी की, एवढा सगळा प्रकार असूनही शब्दांबाबत सर्वमान्यता पावलेले संकेत खंबीर पायावर उभे राहून अर्थवहनाचं, अर्थचित्र प्रकटनाचं काम प्रामाणिकपणे आणि बिनचूकपणे पार पाडतात. निरनिराळ्या व्यक्तिमत्त्वांच्या शब्दांना अर्थपूर्णतेच्या दोऱ्यात ओवून सुंदर, सुरेख सर तयार करून ते भाषासुंदरीला अर्पण करतात !

**४३ विजयनगर, पुणे ४११ ०३०**

**प्रत्यक्ष दर्शन आणि परोक्षश्रवण**

एकदा चित्र दाखवणं हे शंभर शब्द सांगण्याच्या बरोबरीचे आहे.

**चिनी म्हण**

# गंगागवरीच्या निमित्ताने

## वसुधा भिडे

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात बोलीभाषांच्या कोशाचे काम सुरू आहे. मराठी भाषकांचे तीस विभाग करून ठिकठिकाणी मिळणारे एकाच कार्याचे वेगवेगळे शब्द एकत्र करून मराठीचे शब्दभांडार म्हणजेच तिची विविध प्रकारची लेणी, तिची समृद्धी कोशगत करून ती सर्वांना खुली करावी असा त्यामागचा उद्देश आहे. इथे काम करीत असताना काही सुंदर शब्द मन वेधून घेतात आणि शिंपल्यातून मोती मिळाल्याचा आनंद होतो.

असेच एका शब्दाने माझे लक्ष वेधून घेतले. बेळगाव भागात उत्तरा नक्षत्राला 'गंगागवरी' असे म्हणतात. गंगागौर म्हणजे भाद्रपदात येणारी गौर. उत्तरा नक्षत्र सुरू असताना घरात गंगागौरी येतात म्हणून ह्या नक्षत्राला 'गंगागवरी' हे नाव मिळाले असावे. गंगा आणि गौरी या दोन्ही हिमालयाच्या कन्या आहेत. त्यातली गंगा ही ज्येष्ठ आणि गौरी ही कनिष्ठ. गौरीने शंकराला वरले आणि गंगेनेही त्यालाच वरले. भाद्रपदात उभ्या गौरी ज्यांच्याकडे असतात त्यांच्याकडे ज्येष्ठा आणि कनिष्ठा हे शब्द ऐकायला मिळतात. कोकणात गौरी-गणपतीचा सण फार महत्त्वाचा मानला जातो. कोकणातील ग्रामीण भागातील स्त्रिया गौरीच्या सणाला निरनिराळ्या प्रकारची गाणी म्हणत नृत्य करतात. अशा स्त्रीगीतांचा संचय करीत असताना 'गंगागवरी' हा शब्द भाद्रपदातील गौरीच्या संदर्भात आलेला आहे.

आधी या वंदते ग नार दर्या सागरा  
मंग हो वंदते ग नार सूर्या देवाला  
मंग हो वंदते ग नार गंगागवरीला  
मंग हो वंदते ग नार घरच्या देवाला.

अशा प्रकारे सागर, सूर्य, गंगागवरी आणि घरच्या देवाला या स्त्रिया वंदन करतात.

भाषिक पाहणीत आढळलेल्या 'गंगागवरी' या शब्दाने माझे कुतूहल चाळवले गेले आणि मराठी भाषेत गंगेच्या अनुषंगाने येणारे निरनिराळे शब्द मला आठवू लागले.

गंगा म्हटले की प्रत्येक हिंदू मन उचंबळून येते. कारण प्रत्येक हिंदुमात्राच्या दृष्टीने आध्यात्मिक क्षेत्रात जशी गीता श्रेष्ठ आहे तशी धार्मिक क्षेत्रात गंगा श्रेष्ठ

आहे. परंतु गंगा उत्तर हिंदुस्थानात फार दूर म्हणून दक्षिणेत गोदावरीला गंगा म्हणतात. एवढेच नव्हे तर कुठल्याही नदीला लोक गंगा म्हणतात आणि रोजच्या स्नानाच्या गोल आकाराच्या धातूच्या भांड्याला गंगाळ म्हणजे गंगालय असे म्हणतात. स्नान करताना 'हर गंगे भागीरथी' असे म्हणून तिचे नित्य स्मरण करतात. गंगेसारखे पवित्र, शुद्ध जीवन आपले व्हावे असा त्यामागचा हेतू असतो. गंगेच्या पवित्र पाण्याला गंगोदक असे म्हणतात. हे गंगोदक मृत्युसमयी आपल्या मुखात पडावे असे प्रत्येक हिंदुमाणसाला वाटत असते. शिवाय गंगाकिनारी मृत्यू आला तर तो फारच पुण्यप्रद समजला जातो. एखाद्या माणसाने हातात गंगेचे पाणी घेऊन शपथ घेतली तर तो माणूस ती शपथ पाळायला गंगेच्या साक्षीने वचनबद्ध आहे असे समजतात. अशा शपथेला गंगाजलशपथ असे म्हणतात.

कोकणात राजापूर येथे दर बारा वर्षांनी गंगा येते अशी समजूत आहे. तेव्हा भाविक लोक तिचे दर्शन, पूजन, करण्यासाठी जातात, तिच्यात स्नान करतात. ही गंगा राजापुरी गंगा म्हणून प्रसिद्ध आहे. खूप दिवसांनी येणाऱ्या व्यक्तीला राजापुरी गंगा आली असे म्हणण्याचा प्रघात आहे. महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागात 'गंगंकडं' हा शब्द उत्तर दिशा या अर्थी वापरला जातो. लोकमानसातील गंगेकडे जाण्याची उर्मी आणि तिजविषयीची भक्ती मला या शब्दांतून प्रतीत होते. पूर्वीच्या काळी विधवा स्त्रीचा उल्लेख गंगाभागीरथी असा करीत असत. त्यातही गंगेसारखी पवित्र स्त्री असा तिचा गौरव करीत असत. समर्थ रामदास प्रयत्न न करता एखादी चांगली गोष्ट कुणाला मिळाली तर तिचा उल्लेख 'आळशावरी गंगा आली' असा करतात.

गंगाजळी म्हणजे साठवलेला पैसा. जो खर्च न करण्यासाठीच शिल्लक टाकायचा असतो. घरात जे गंगाजल ठेवलेले असते तेही विशेष कारणाशिवाय खर्च न करण्यासाठीच ठेवलेले असते. त्या गंगाजलावरूनच गंगाजळी हा शब्द प्रचारात आला असावा. गंगाजमनी हा शब्द दोन भिन्न धातूंनी बनवलेल्या घागरीसाठी वापरतात. गंगा आणि यमुना ह्या नद्यांचा प्रयागला संगम होतो. तेथे श्यामलांगी यमुना गौरांगी गंगेला जेथे मिळते तेथे एक काळसर रेषा दिसते. ती रेषा यमुनेचे वेगळेपण स्पष्ट करते. म्हणूनच भिन्न धातूंनी बनवलेल्या भांड्यांना गंगाजमनी असे म्हणतात.

जातगंगा म्हणजे गंगेच्या प्रवाहाप्रमाणे अखंड असलेली जात. ग्रामीण भागात एखाद्या तंट्याचा निवाडा करायचा असेल तर जातगंगा ठरवील त्याप्रमाणे होईल असे म्हटले जाते. जातगंगेला गंगागोत असाही शब्द आहे पण तो कसा रूढ झाला असावा ते समजत नाही. त्याचप्रमाणे गगावळ, गंगावन हे शब्द कसे रूढ झाले असावेत ते समजत नाही.

'गंगागवरी' या शब्दावरून गंगेच्या संदर्भात जेवढे वाक्प्रचार आठवले, त्यांचा जमला तेवढा आढावा घेतला आहे.

**मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७**





अनुक्रमणिका

# प्रो. रानडे यांचा नवा इंग्रजी–मराठी कोश

दि ट्वेंटिएथ सेंचुरी इंग्लिश मराठी डिक्शनरी १९०३ ते १९१६ या १३ वर्षांच्या काळात प्रसिद्ध झाली. १९०३ साली पहिला भाग प्रसिद्ध झाला, त्या वेळी लोकमान्य टिळकांनी केसरीत अग्रलेख लिहून प्रा. रानडे यांच्या अभूतपूर्व शब्दकोशकार्याचा गौरव केला. अद्यापही प्रा. रानडे यांच्या शब्दकोशाशी तुलना होऊ शकेल असा दुसरा इंग्रजी–मराठी शब्दकोश उपलब्ध नाही. या पुनर्मुद्रित आवृत्तीत लोकमान्य टिळकांचा अग्रलेख ''केसरी''च्या सौजन्याने येथे संपूर्ण उद्धृत करत आहोत.

या अग्रलेखाच्या निमित्ताने लो. टिळकांनी कोशरचनेचे महत्त्व, कोशकार्यातील अडचणी, परभाषेतील शब्दांची ग्राह्याग्राह्यता यासंबंधी आपले मार्मिक विचार व्यक्त केले आहेत. भाषा आणि जीवनच्या वाचकांसाठी त्या विचारांची ही पुनर्भेट घडवत आहोत.

कोश आणि व्याकरण हीं कोणत्याहि भाषेच्या उत्कर्षाचीं प्रधान अंगें होत. जामदारखान्यांत केवळ रत्नें पुष्कळ आल्यानें भागत नाहीं, तर ज्याप्रमाणें जामदारखान्याच्या मालकाजवळ सदर रत्नांच्या रूपाची, वर्णाची व किमतीची याद असावी लागते, तद्वतच भाषेचें शब्दभांडागार वापरणाऱ्या लोकांची स्थिति होय. भाषेस जें प्रौढ स्वरूप प्राप्त होतें तें त्यांतील शब्दसंचयामुळे होत असतें. पण आपणाजवळ शब्दसंचय आहे किती, असलेला पुरा नसल्यास नवीन किती मिळण्याचा संभव आहे, असलेल्या संचयाची योग्यता काय आणि त्याच्यामध्यें अर्थद्योतकपणा किती किंवा वतनदारी कोणत्या प्रकारची आहे हें जर नीट लक्षांत नसेल, तर शब्दसंचय पुष्कळ असूनहि त्याचा उपयोग चांगल्या रीतीनें करता येणें शक्य नाही. भाषेस कोशाची आणि व्याकरणाची जी मदत होते ती याच कामी होय; आणि या कारणांमुळेंच जगांतील नव्या–जुन्या सर्व प्रौढ भाषांचे कोश व व्याकरणें झालेलीं आपल्या दृष्टीस पडतात. व्याकरण हें वेदाचें मुख व निरुक्त हे कान आहेत, असे षडंगांतील दोन अंगांसंबंधानें प्राचीन उल्लेख आहेत. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे कोश आणि व्याकरण हे दोनहि भाषेचे जीवप्राणच समजले पाहिजेत. ज्या सिद्ध पुरुषांच्या जिव्हाग्रीं सरस्वती वास करीत असते त्यांस कोशाची अगर व्याकरणाची तादृश जरूर लागत नाहीं. एवढ्यावरून कोश आणि व्याकरण ही साधनें भाषेच्या

अभिवृद्धीस आवश्यक नाहींत असें जर कित्येकांचें मत असेल, तर तें अगदी चुकीचें आहे. ' ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोंनुधावति ' हे वचन जरी खरें असलें, तरी सर्वच ग्रंथकारांचा अधिकार एवढा मोठा असतो असें नाहीं. वाग्देवीचें मंदिर लुटण्याची निसर्गतःच ज्यास मोकळीक मिळाली आहे त्यांची आणि भाषेंतील इतर ग्रंथकारांची तुलना करूं लागल्यास पुष्कळ प्रसंगीं ' घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः ' असें म्हणण्याची पाळी आल्याखेरीज रहावयाची नाहीं. सारांश, देशांत संपत्ति कितीहि विपुल असली, तरी तिचा एके ठिकाणीं ज्याप्रमाणें व्यवस्थित संग्रह करावा लागतो तद्वतच व्याकरणाच्या कसोटीस लावून शब्दरत्नें मोठ्या काळजीनें आणि व्यवस्थित रीतीनें संग्रहित करावीं लागतात. हें काम मोठ्या मेहनतीचें, विद्वत्तेचें, आस्थेचें आणि शोधपूर्वक विवेचनाचें असते. भाषेचे घटकावयव काय, प्रसंगानुसार यौगिक किंवा व्युत्पत्तिदृष्ट्या समानार्थक शब्दांची रूढ भाषेंत भिन्नार्थी योजना कशी करतात, त्यांतील भेदाभेद कोणते आणि ते पहिल्यापासून तसेच कायम आहेत, कीं भाषेच्या वाढीबरोबर बदलत चाललेले आहेत, नव्या कल्पना, नवे विचार भाषेमध्यें घेण्यास जीं द्वारें आहेत, तीं भाषेच्या अभिवृद्धीस पुरेशीं विस्तृत आहेत, कीं अधिक विस्तृत करावयास पाहिजेत, एकच भाषा बोलणारे परंतु निरनिराळ्या प्रांतांत रहाणारे अशा लोकांत प्रयोगांचीं किंवा शब्दांचीं निरनिराळीं स्वरूपें कशी होतात, त्यांतील ग्राह्य कोणतीं आणि अग्राह्य कोणतीं, शुद्ध कोणतीं अशुद्ध कोणतीं, इत्यादि अनेक गोष्टींचें धोरण ठेवून कोशकारांस आपलें काम करावें लागतें. संस्कृत भाषेंत छप्पन कोश आहेत. पण त्यांत अमरकोशाचीच योग्यता कां विशेष धरली जाते, याचा ज्यानें थोडाबहुत विचार केला असेल, त्यास आमच्या म्हणण्याचा प्रत्यय आल्याखेरीज रहाणार नाहीं. त्यांतून अलीकडे अलीकडे जगांतील सर्व भाषांचा अभ्यास पाश्चिमात्य विद्वानसमूहांत सुरू झाला असल्यामुळें निरनिराळ्या भाषेंतील शब्दांची तुलना करणें हा कोशकारांस एक अधिक विषय झाला आहे; आणि सर्वांचा विचार करून स्वभाषेत कोश करणें मोठ्या विद्वत्तेचेच नव्हे, तर मोठ्या परिश्रमाचेंहि काम झालें आहे.

स्वभाषेतल्या स्वभाषेंत कोशरचना असली तरी, कोशकारांस किती गोष्टींकडे लक्ष पुरवावें लागतें हें या गोष्टीवरून कळून येईल. परंतु एका भाषेंतील विचार जेव्हां दुसऱ्या भाषेंत उतरावयाचे असतात, तेव्हां कोशकारांस वरच्यापेक्षांहि अधिक परिश्रम करावे लागतात; इतकेंच नव्हे तर, एका भाषेच्या ऐवजीं दोन्ही भाषांचेंहि पुरें ज्ञान त्यास असावें लागतें. तशांतून एक भाषा अभिवृद्धीच्या शिखरास पोहोंचलेली आणि दुसरीच्या अभिवृद्धीस नुकताच आरंभ झालेला, अशी स्थिति असेल तर मग कांहीं विचारावयासच नको. कोणतीहि भाषा घ्या. त्यांतील शब्दसमूह ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या विचारांचे, ज्ञानाचे किंवा एकंदर समाजस्थितीचे

चित्राप्रमाणें द्योतक असतात; किंबहुना एखाद्या तळ्यांत सभोंवारच्या वस्तूंचें जसें प्रतिबिंब पडतें त्याचप्रमाणें प्रत्येक देशांतील लोकांच्या आचारविचाराचें, धर्माचें, नीतीचें, तत्त्वज्ञानाचें, व्यापाराचें व समाजस्थितीचें चित्र त्यांच्या भाषेंत उतरलेलें असतें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. 'वाच्यार्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिसृताः ' असें जे मनूनें म्हटलें आहे ते अगदी यथार्थ आहे; व त्यामुळेंच भाषेच्या अभिवृद्धीवरून लोकांची स्थिति व लोकांच्या स्थितीवरून भाषेची अभिवृद्धि यांजबद्दल सहज अनुमान करतां येतें. आतां ही गोष्ट उघड आहे कीं, निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या धर्मानें आणि निरनिराळ्या परिस्थितींत वागणाऱ्या लोकांचे विद्या, धर्म, नीति, व्यवहार किंवा त्यासंबंधीचे विचार बरेच भिन्न भिन्न असले पाहिजेत. अर्थात भिन्न भिन्न देशांतील लोकांच्या भाषेंतील शब्दसमूहहि भिन्न भिन्न अर्थांचा द्योतक असला पाहिजे. अशा भिन्न भिन्न शब्दसंग्रहांची तुलना करणें म्हणजे अमेरिकेंतील अँडीस, युरोपांतील आल्प्स आणि आशियांतील हिमालय यांपैकी कोणत्या तरी एका पर्वताचे वर्णन दुसऱ्या पर्वताच्या वर्णनांत असलेल्या शब्दांनींच व्यक्त करण्यासारखें आहे. मानवजातीच्या व्यवहारांत जे शब्द सामान्य असतात तेथें विशेष पंचाईत पडत नाहीं; पण प्रत्येक देशांतील लोकांच्या विशिष्ट विचारांचें, मनोधर्माचें किंवा मनोविकारांचें अथवा सुखदुःखाचें चित्र ज्या शब्दांत असतें तशा शब्दांची तुलना करण्याचा प्रसंग आला म्हणजे कोशकारांस पुष्कळ अडचण व त्रास पडतो. त्यांतून एक भाषा प्रगल्भ व दुसरी बाल्यावस्थेंत असेल, तर ही अडचण कधीं कधीं इतकी दुर्घट होते कीं, परिभाषेतील शब्द जसाचा तसा ठेवून त्याचा कसाबसा विस्तृत अर्थ देऊनच काम भागवावें लागतें. एखाद्या नागरिक प्रौढ वधूच्या शृंगारांतील नखरा खेडेगांवांतील मुग्ध वधूजनांच्या विलासानें व्यक्त करणें जितकें अवघड आहे तितकेंच प्रौढ भाषेंतील शब्दांचे निरनिराळे वाच्य किंवा व्यंग अर्थ त्यापेक्षां कमी दर्जाच्या भाषेंतील शब्दांनीं स्पष्ट करणें दुर्घट होय. त्यांतूनहि जेव्हां निरनिराळ्या भाषेंतील म्हणींचा विचार किंवा तुलना करावी लागते तेव्हां पुष्कळ वेळां ही अडचण अपरिहार्य अशी भासूं लागते. तथापि कोशकाराने जें काम पत्करलेलें असतें त्याच्या सांगतेस या सर्व अडचणींचा यथाशक्ती त्यास परिहार करावा लागतो. अर्थात हें काम सर्वांशीं पूर्ण होणें कधींच शक्य नसतें, पण पूर्व ग्रंथकारांच्या किंवा कोशांच्या सहाय्यानें आणि समकालीन विद्वत समूहांच्या मदतीनें जेथवर मजल पोहोंचविणें शक्य असेल तेथवर इष्ट कार्याची मजल नेणें हे प्रत्येक कोशकाराचें कर्तव्य आहे; आणि कोणत्याहि कोशाचें परीक्षण करतेवेळीं या सर्व गोष्टींचा अवश्य विचार केला पाहिजे. इंग्रजी भाषेचा पहिला कोश डॉक्टर जॉन्सननें केला, व तेव्हां भाषेच्या वाढीस अवश्य लागणारे लॅटिन व ग्रीक भाषेंतील पुष्कळसे शब्द त्यानें इंग्रजी कोशांत सामील केले. पण हल्लींचे इंग्रजी भाषेचें स्वरूप पाहिलें, तर या

अवजड शब्दांच्या ऐवजीं सोपे शब्द घालण्याची प्रवृत्ती नजरेस येते. तथापि एवढ्याच करितां जॉन्सन यांस दोष देणें कधींच वाजवी होणार नाहीं. भाषेची अभिवृद्धी पुढें कशी व्हावी याबद्दल जरी आज थोडेंबहुत अनुमान करतां आलें तरी पुढें जी अभिवृद्धी सर्वांशीं तशीच होते असें नाहीं. सबब वाढत्या भाषेचा कोश करणारानें आपल्या किंवा आपल्या वेळच्या समजुतीप्रमाणे आपलें काम पुरें करून टाकणें एवढेंच त्याचें कर्तव्य आहे व तें केलें म्हणजे त्यानें आपलें काम चांगल्या रीतीनें बजावलें, असें म्हटलें पाहिजे.

हे विचार सुचण्याचें कारण प्रो. एन्. बी. रानडे, बी. ए., यांनीं विसाव्या शतकांतील इंग्रजी–मराठी कोशाचा आमच्याकडे पाठविलेला पहिला भाग होय. अशा प्रकारचा पहिला मराठी कोश म्हटला म्हणजे कँडीसाहेबांनीं केलेली इंग्रजी–मराठी डिक्शनरी आहे. पण ही डिक्शनरी अव्वल इंग्रजी असल्यामुळें गेल्या ५० वर्षांत मराठी भाषेच्या शब्दसंग्रहांत जी भर पडलेली आहे किंवा भाषेच्या स्वरूपांत जो फरक पडलेला आहे तो कँडीसाहेबांच्या डिक्शनरीत आढळून येत नाहीं. उलट कित्येक वेळां केवळ या डिक्शनरीच्या सहाय्यानें इंग्रजीतून मराठींत भाषांतरें परकीय लोक Sugar–coated यांचे 'साखरावगुंठित' असें भाषांतर करून न जाणतां आपणांस व आपल्या भाषांतरास उपहासास पात्र करून घेतात. भाषा हा विषयच असा कांहीं नाजूक आहे कीं, जेव्हां एखाद्या भाषेंत नवे विचार व्यक्त करावयाचे असतात तेव्हां ती ज्यांची स्वभाषा आहे त्यांच्या हातून ते जसे व्यक्त होतात तसे इतरांच्या हातून होत नाहींत. मिशनरी लोकांनीं केलेल्या बायबलाच्या भाषांतरावरून ही गोष्ट उघड होत आहे. हे मिशनरी किंवा कँडीसाहेब यांना महाराष्ट्रांतील लोकांचें साहाय्य नव्हतें असें नाहीं. तथापि एखादी भाषा आपली जन्मभाषा असल्यानें सदर भाषेंतील अर्थाचे भेद किंवा इतर स्वारस्य जितकें आपणांस अचूकपणें समजतें तितकें तें परकीयांस समजणें कठीण आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इंग्रजी–मराठी कोशाचें काम प्रो. रानडे यांच्यासारख्या विद्वान मनुष्यानें हातीं घेतलें आहे, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. त्यांतूनहि विशेष समाधान मानण्यासारखी गोष्ट ही कीं, प्रो. रानडे यांनीं या कामीं अलीकडील निरनिराळ्या पाश्चिमात्य शास्त्रांत प्रवीण असलेल्या बहुतेक विद्वानांचें साहाय्य घेतलें आहे; इतकेंच नव्हे तर, निरनिराळ्या शास्त्रांतील पारिभाषिक शब्द त्या त्या शास्त्रांतील प्रवीण लोकांच्या नजरेखालून जातील अशी पहिल्यापासून तजवीज ठेविली आहे. इंग्रजी भाषेंतील निरनिराळ्या शास्त्रांचे ज्ञान आपल्या देशबांधवांस व्हावें याबद्दल महाराष्ट्रांतच नव्हे, तर बंगाल, पंजाब, सिंध, गुजराथ, मलबार किंवा मद्रास प्रांतांत सुशिक्षित लोकांचे प्रयत्न गेल्या पाच–पन्नास वर्षे एकसारखे चालू आहेत; व ज्यांनीं ज्यांनीं असे प्रयत्न सुरू केले आहेत; त्यांस त्यांस सर्व ठिकाणीं एकच म्हणजे नवीन शब्द-





अनुक्रमणिका

समूहांची अडचण आलेली आहे आणि ती दूर करण्याबद्दल प्रत्येक प्रांतांतील विद्वानांचें आपापल्या परीनें प्रयत्न चालू आहेत. गणित, ज्योतिष, शिल्पकला, यांत्रिक ज्ञान, भूगर्भशास्त्र, जीवनशास्त्र, कायदा, नीतिशास्त्र इत्यादी अनेक विषयांवर पाश्चिमात्य विचार देशी भाषांतून उतरण्यास शब्दांची अडचण सर्व ठिकाणीं एकसारखीच असल्यामुळें व ही अडचण दूर करण्यास सर्वांच्या दृष्टीनें मुख्य साधन संस्कृत असल्यानें निरनिराळ्या प्रांतांतून पुष्कळ अंशीं एकाच धर्तीवर नवीन शब्दरचना आढळून येते. बडोद्यांत श्री. सयाजीरावमहाराज यांनीं काढलेल्या कलाभुवनाकरितां शास्त्रीय परिभाषा निश्चित करून त्याचा कोश करण्याचें काम कांहीं दिवसांपूर्वीं चालू होतें, व हल्लीहि बनारस येथें नागरी प्रचारणी सभेंत तोच क्रम सुरू ठेवला आहे. बंगाल्यांत विश्वकोश म्हणून इंग्रजींत ज्यास एन्सायक्लोपीडिया म्हणतात तशा प्रकारचा एक कोश तयार झाला आहे; आणि निरनिराळ्या प्रांतांतील देशी भाषांतून जीं वर्तमानपत्रें किंवा मासिक–पुस्तकें निघतात त्यांतून नवे शब्द, नवी कल्पना किंवा नवी भाषासरणी आणि विचारपद्धती जारीने प्रचारांत येऊं लागली आहे. ही जी भाषेच्या अभिवृद्धीची प्रवृत्ति हल्लीं चालू आहे, तिचें धोरण कोणत्या प्रकारचें आहे हें लक्षांत आणून त्याप्रमाणें नवे शब्द बनविणें किंवा परिभाषा ठरविणें अथवा ठिकठिकाणीं जे शब्द पूर्वींच बनविले असतील त्यांतील ग्राह्य कोणते, अग्राह्य कोणते हें ठरवून त्याप्रमाणें इंग्रजी भाषेंतील शब्दांस प्रतिशब्द देणें हें हल्लींच्या परिस्थितींत इंग्रजी भाषेंतील शब्दांचा देशी भाषेंत परिपाक करू इच्छिणाऱ्या कोशकारांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य प्रो. रानडे यांनीं चांगल्या रीतीनें बजावलें आहे असें हल्लींच्या त्यांच्या कोशाच्या भागावरून व त्यास जोडलेल्या प्रस्तावनेवरून दिसून येतें. कै. पांडुरंग गोपाळ मंत्री यांनीं या कोशाकरितां वनस्पतिशास्त्राचे एक हजार शब्द तयार करून दिले आहेत; व डॉ. देशमुख, प्रो. गज्जर, रा. ब. महाजनी, डॉ. गर्दे, वगैरे निरनिराळ्या ठिकाणच्या नव्या–जुन्या विद्वानांनीं साहाय्य केल्यामुळें प्रो. रानडे यांच्या कोशास एक प्रकारचें सार्वजनिक स्वरूप प्राप्त झालें आहे. इतक्या विद्वानांचें साहाय्य मिळण्यास किती प्रयास पडतात, हें अनुभवाशिवाय कोणाच्याहि लक्षांत येणें कठिण आहे. तथापि इतकें सर्व परिश्रम घेऊन प्रो. रानडे यांनीं मराठी भाषेचें सद्यःस्वरूप या कोशाच्या रूपानें महाराष्ट्र–लोकांपुढें मांडलें याबद्दल सर्वांनीं त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. हा उद्योग एकदम नजरेंत भरण्यासारखा नसल्यामुळें कित्येकांस त्याचे पूर्ण स्वरूप लक्षांत येत नाहीं. तथापि थोडीशी मेहनत घेऊन या कोशांतील ठळक ठळक शब्द जर कोणी पाहील, तर प्रो. रानडे यांच्या श्रमाची किंमत त्यास सहज कळून येईल. उदाहरणार्थ Art शब्द घ्या. त्या शब्दापासून इंग्रजीमध्यें Artifice, Artist, Artistic, Artisan वगैरे पुष्कळ शब्द निष्पन्न झाले आहेत. या सर्व शब्दांचा इंग्रजीतील अर्थभेद लक्षात आणून त्याप्रमाणे मराठीत शब्दयोजना

करण्याचा प्रो. रानडे यांनीं केलेला प्रयत्न; आणि अशा प्रकारचा प्रयत्न नवा असल्या-मुळें जरी क्वचित् कोणाचा एखाद्या स्थळीं मतभेद असला तरी, रानडे यांच्या कोशांत दिलेल्या प्रतिशब्दापासून इंग्रजींतून मराठींत भाषांतर करणारांस पुष्कळच मदत होईल यांत बिलकुल शंका नाहीं. तसेच Association हा शब्द पाहिला असतां केवळ 'सभा' एवढचा महाराष्ट्र शब्दानेंच त्याचा अर्थ व्यक्त न होता निरनिराळचा प्रसंगीं निरनिराळे कसे शब्द योजावे लागतात हेंहि लक्षांत येईल. अशा तऱ्हेचीं दुसरींहि या कोशांत पुष्कळ उदाहरणें आहेत. पण तीं सर्व येथें देऊन आम्ही जागा अडवीत नाहीं. आणखी एकाच गोष्टीचा उल्लेख करून संपवितों. ती ही कीं, जे कांहीं इंग्रजी शब्द महाराष्ट्र–भाषेत रूढ झाल्यासारखे आहेत ते टाकून देण्यांत आतां कांहीं अर्थ राहिलेला नाहीं, हें तत्त्व प्रो. रानडे यांच्याप्रमाणें आम्हांसहि मान्य आहे. बुकास पुस्तक, पेन्सिलीला शलाका, स्लेटीस अष्मपाटी किंवा रेल्वेस लोहमार्ग आणि स्टेश-नास बाष्परथोच्छ्वासस्थान अगर तिकिटास प्रवासपत्र वगैरे प्रतिशब्द देण्यांत कांहीं हंशील नाहीं. भाषेत परकीय शब्द नसणें हें स्वाभिमानाचें लक्षण आहे खरें; पण त्याचा अर्थ असा कीं, परकीय शब्दांचा स्वदेशी शब्दांवर शिरजोरपणा होऊं नये; परकीय शब्द मुळींच स्वभाषेंतून येऊं नयेत असा नव्हे. संस्कृत भाषेंतहि सामी, ताम-रस इत्यादी शब्द किंवा ज्योतिषशास्त्रांतील जामित्र, होरा, वगैरे शब्द परकीय आहेत ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे; व इंग्रजी लोकांसहि त्याचप्रमाणें त्यांचा ज्या देशांशीं संबंध आला त्या त्या देशांतील शब्द आपल्या भाषेच्या कोशांत सामील करून घ्यावे लागले आहेत. हाच मार्ग मराठी भाषेंतहि स्वीकारण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र तो स्वीकारतांना एवढी खबरदारी घेतली पाहिजे कीं, त्यामुळें मराठी भाषेचा मराठीपणा मोडणार नाहीं.

सारांश, प्रो. रानडे यांनीं हा जो उद्योग आरंभिला आहे तो महाराष्ट्र–भाषेच्या अभिवृद्धीस अत्यंत आवश्यक आहे, हे कोणीहि सूज्ञ मनुष्य कबूल करील. गेल्या ३०–४० वर्षांत मराठी भाषेस एक प्रकारचें नवीन स्वरूप प्राप्त झालें आहे; आणि त्यांत स्पेन्सरचें तत्त्वज्ञान, मिल्लचें अर्थशास्त्र, किंवा हक्स्ले, टिंडाल वगैरे आधि-भौतिक शास्त्रावरील विचार येऊं लागले आहेत; एवढेच नव्हे तर वनस्पतिशास्त्र यांवरहि पाश्चिमात्य ग्रंथांच्या साहाय्यानें इकडे ग्रंथ होऊं लागलें आहेत. या सर्व ग्रंथांतून आलेली परिभाषा एकवट करून पुढचा प्रगतीचा मार्ग दाखविणें हें भाषेच्या खऱ्या हितचिंतकाचें कर्तव्य होय; आणि तें काम प्रो. रानडे यांनीं मोठासा आश्रय नसतांहि केवळ आपल्या हिंमतीवर अंगावर घेतलें हें त्यास भूषणावह आहे. मराठी भाषेची वाढ अद्याप पुरी झाली नसल्यामुळें हा कोश आणखी २५–३० वर्षांनीं पुन: सुधारावा लागेल हें उघड आहे. पण तेवढचानें प्रो. रानडे यांच्या ग्रंथाची योग्यता कमी होत नाहीं. करितां मराठी भाषेच्या हितचिंतकांकडून त्यांच्या परिश्रमाचें

चांगलें चीज होईल अशी आम्हांस आशा आहे. कँडी व मोल्स्वर्थ यांचे कोश जेव्हां बाहेर पडले तेव्हां त्यास सरकारचा आश्रय होता, तशा प्रकारचा आश्रय हल्लींच्या ग्रंथास मिळणें अगदीं योग्य आहे. पण हल्लींची परिस्थिति लक्षांत आणतां केवळ त्याच्यावरच अवलंबून राहाणें बरोबर होणार नाहीं हें आम्ही सांगावयास नको. कसेंहि असो; एवढी गोष्ट निश्चित आहें कीं, महाराष्ट्रभाषेच्या हितचिंतकांनी उदार आश्रय देऊन हें काम तडीस नेणें जरूर आहे. सुपर रॉयल अष्टपत्री साच्याच्या १४०० पानांचा कोश वर्गणीदारांस १० रुपयांस मिळेल हा कांहीं लहानसहान लाभ नव्हे. कांहीं उदार गृहस्थानीं शंभर शंभर रुपये पहिल्याने कर्जाऊ देऊन त्या कृत्यास आश्रय दिला आहे. परंतु एवढा ग्रंथ छापण्यास सुमारे १५००० रुपयांहून अधिक खर्च येणार असल्यामुळें यापेक्षां जास्त आश्रय मिळणें जरूर आहे, व तो मराठी भाषेच्या हितचिंतकांकडून प्रो. रानडे यांस मिळेल अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. अशा प्रकारचीं मोठीं कामें चांगल्या आश्रयाखेरीज होत नसतात, हें आम्हीं सांगावयास नको; व आम्हांस अशी आशा आहे कीं, प्रत्येक इंग्रजी–मराठी जाणणारा या बडचा कोशाची एक प्रत घेऊन महाराष्ट्र–भाषेच्या अभिवृद्धीस मदत केल्याचे श्रेय घेतल्यावांचून रहाणार नाहीं. स्वभाषेच्या अभिवृद्धीस मदत करणें म्हणजे पुष्कळ अंशी स्वदेशाच्या अभिवृद्धीस मदत करण्यासारखेच आहें, हे आम्हीं सांगावयास नको.

**पूर्वप्रसिद्धी : अग्रलेख : केसरी १९०३.१०.२७**
**प्रेषक : स. मा. गर्गे, भारतीय समाजविज्ञान कोश कार्यालय, पुणे ४११ ००४**

वाचनामुळे माणूस पूर्ण (तयार) होतो– चर्चांमुळे तत्पर होतो आणि लेखनामुळे परिपूर्ण होतो.

– फ्रान्सिस बेकन

# भाषेतील बदल, बायकांच्या बाबतीत

( **भाषा आणि जीवन** च्या दिवाळी १९८४ च्या अंकात 'बायकांची भाषा' हा द. पां. खांबेटे यांचा लेख वाचकांनी वाचला असेल. भाषा तीच पण बायकांच्या संदर्भात तिचे अर्थ कसे बदलतात हे पुढील टीकाटिप्पणीवरून लक्षात येईल.

–संपादक)

## ऑफिसातली टीकाटिप्पणी

### सरिता पदकी

ऑफिसातनं स्त्रियाही काम करतात–पुरुषही. सामान्य स्त्रीपुरुषांचं वागणं जसं घडतं तसंच याही स्त्रीपुरुषांचं घडत असतं. सारख्याच स्वरूपाच्या घटना दोघांच्याही वैयक्तिक आणि कार्यालयीन जीवनात घडत असतात. या घटनांच्या बाबतीत दोघांचं वागणं सारखंच असतं.

पण या वागण्यावर इतरांच्या प्रतिक्रिया कशा होतात ? पुरुषांच्या आणि मजा म्हणजे स्त्रियांच्याही. याची एक छानशी नोंद केलेली वाचली. ही नोंद केलेली आहे नताशा जोसेफोविझ यांनी.

त्यांनी दिलेली उदाहरणं आपल्याला तर पटतीलच, पण आणखीही प्रत्येकाच्या अनुभवातली उदाहरणं आठवतील. आणि कदाचित यापुढची टीकाटिप्पणी अधिक सावधानतेनं, अधिक सुजाणपणानं होईल. स्त्री–पुरुषांच्या बाबतीत निकष एकच राहील ?

तर ही ती टीकाटिप्पणी :

**१) टेबलावर कुटुंबाचा फोटो आहे.**

तो–अगदी कुटुंबवत्सल, जबाबदार माणूस दिसतोय.

ती–इथंदेखील घरदार विसरत नाहीये.

**२) टेबलावर पसारा आहे.**

तो–फार काम करतोयसं दिसतंय. कामापुढे पसारा आवरायला वेळ कुठला ?

ती–अगदी अव्यवस्थित बाई दिसतेय. डोक्यातदेखील असाच पसारा नसला म्हणजे झालं !

**३) जागेवर नाहीये.**

तो–मीटिंगला गेलेला दिसतोय.

ती–गेली असेल लेडीज रूममध्ये !

**४) ऑफिसात नाहीये.**

तो–क्लायंटकडे गेला असेल.

ती–गेली असेल शॉपिंगला.

**५) साहेबांबरोबर लंच चाललंय.**

तो–प्रमोशन मिळणारसं दिसतंय हं !

ती–अफेअर चालू असणार, दुसरं काय ?

**५) साहेबानं चांगलं फैलावर घेतलं**

तो–सुधारेल आता काम त्याचं !

ती–फार अपसेट झाली असेल नं ?

**७) उगाचंच जोडे बसले.**

तो–संतापला असेल चांगला !

ती–रडली असेल ना घळाघळा !

**८) लग्न ठरलंय.**

तो–आता जास्त व्यवस्थितपणे काम करील.

ती–आता नऊ महिन्यात जॉब सोडते बघा !

**९) मूल होणार आहे.**

तो–आता पगार वाढवा म्हणावं.

ती–द्या. आता बाळंतपणाची रजा, सोसा नुकसान.

**१०) धंद्यानिमित्त टूरला जायचंय**

तो–करियरच्या दृष्टीनं चांगलंय त्याच्या.

ती–नवऱ्याची परवानगी आहे का पण ?

**११) चांगला जॉब मिळाल्यानं हा सोडायचाय.**

तो–छान संधी पटकावलीन बेटचानं.

ती–या बायकांचं नेहमी असं असतं. कधी नोकरी सोडतील त्याचा नेम नसतो !

**पूर्वप्रकाशन : स्त्री, मे, १९८६ पृ. ३७**



अनुक्रमणिका

# आणि काही भाषिक / कौटुंबिक कोडी
# ( अर्थात बायकांच्या बाबतीतली )

**श्यामला वनारसे**

(१) एक वडील आणि मुलगा एकदा मोटारीतून प्रवासाला निघाले. गावाबाहेर त्यांना अपघात झाला. वडिलांना फार काही झालं नाही. मुलगा मात्र गंभीररीत्या जखमी झाला. वडील त्याला घेऊन हॉस्पिटलमध्ये गेले. डॉक्टर्सनी त्याला तपासलं आणि तावडतोब ऑपरेशन करायला हवं असा निर्णय घेतला. सर्जनला बोलावण्यात आलं. त्या मुलाला पाहिल्याबरोबर सर्जनच्या तोंडून उद्‌गार आले, 'अरे ! हा तर माझाच मुलगा !' आता सांगा, सर्जन आणि पेशंटचं नातं काय ? (उत्तर अगदी सरळ आहे. पण शंभरातल्या नव्वदांना ते सापडत नाही.)

(२) आईकडे मैत्रीण आली आहे तिचा १५–१६ वर्षांचा मुलगा घरात आहे. 'जरा चहापोहे कर की' असं आई मुलाला म्हणाली. काय मनात येईल तुमच्या ?

(३) नवऱ्यानं परस्पर बेत ठरवून दोघं येऊ म्हणून सांगितलं. त्याच वेळी बाईनं मैत्रिणीला येते म्हणून कबूल केलं. काय निर्णय होईल तुमच्या घरात ?

## दोन उत्तरं असलेली कोडी :

(१) 'सबबी सांगू नका, काम पुरं करून आणा' हे वाक्य पुरुष बोलला तर ? (उत्तर : शिस्तप्रिय) आणि आई बोलली तर ? (उत्तर : हुकुमशाही वृत्तीची)

(२) 'माझं म्हणणं तुमच्यापेक्षा वेगळं आहे'... अशी मीटिंगमध्ये पुरुषानं सुरुवात केली तर ? (उत्तर : सडेतोडपणा) आणि बाईनी केली तर ? (उत्तर : विक्षिप्तपणा)

(३) 'मला विचारल्याशिवाय तुम्ही का ठरवलंत ?' असं पुरुषानं म्हटलं तर? (उत्तर : रास्त) बाईनं म्हटलं तर ? (उत्तर : तिची अरेरावी.)

प्रत्येकानं शोधलं तर अशी आणखी किती तरी कोडी सापडतील. कोड्यांच्या उत्तरांचा अंदाज आला की, असं वाटायला लागतं की, एका फार मोठ्या सांस्कृतिक क्रांतीची गरज आहे.

**पूर्वप्रकाशन :** 'खरं म्हणजे', **किर्लोस्कर** मे १९८६, पृ. ८४
(या लेखामधून मांडणीचे थोडे स्वातंत्र्य घेऊन)





अनुक्रमणिका

## यावर भाष्य न लगे

या अंकाचे मुद्रितशोधन करणाऱ्या आमच्या एका प्राध्यापकाने मुद्रितशोधन करता करता वरील मजकूर प्राध्यापक कक्षात उपस्थित असलेल्या प्राध्यापक–प्राध्यापिकांना सहज म्हणून वाचून दाखवला. त्यावर सर्वजण काही क्षण अंतर्मुख झाले. तेवढ्यात एका प्राध्यापकाने विचारले, "कुणी लिहिलं आहे हो हे? कोण आहे लेखक?" (लेखक बरं का! म्हणजे हा मजकूर ऐकूनही त्यांच्या डोक्यात 'लेखिका' आली नाही.) त्यावर मुद्रितशोधन करणाऱ्याने उत्तर दिलं. "सरिता पदकी अन्..." पण दुसरे नाव ऐकायच्या आधीच ते प्राध्यापक घाईघाईने म्हणाले, "सरिताबाई ना! त्या नेहमी अशाच बोलतात-लिहितात." त्यावर एका प्राध्यापिकेने त्या प्राध्यापकाला लगेच विचारले "काहो, सरिताबाईंनी लिहिला म्हणून असा अभिप्राय का? हाच लेख मंगेश पत्कींनी लिहिला असता तर, ते विचारवंत वगैरे म्हटल असतं ना तुम्ही?"

Learn a new language and get a new soue.
नवीन भाषा शिका आणि नवे व्हा.

—झेक म्हण

Never close your lips to those to whom you have opened your heart.
ज्यांच्यापुढे हृदय उघडं केलं असेल त्यांच्यापुढे ओठ उघडायला कचरू नका.

—चार्ल्स डिकन्स

# भाषा पूर्वी की जीवन पूर्वी ?

## श्यामविमल

पुष्कळ दिवसांपासून मी विचारायला इच्छित असतो की जीवन पूर्वी आलं की भाषा आली. पण हे तर सर्वविदित तथ्य आहे की पूर्वी जीवन नंतर भाषा. तरी सुद्धा या पत्रिकेच्या नावात भाषा पूर्वी आली ? (म्हणजे, कशी आली ? ) कृपया ही शंका निवारली जावी.

मी स्वीकारतो की भाषा जिण्यासाठी जीवाचा संस्कार करते आणि जिण्याचं माध्यम आहे. पण जिणं नि जीवन या शब्दात फरक नाही का ? आपल्यासारख्या विज्ञांकडून जर समाधान झालं तर ज्ञानवर्धन होईल. ( म्हणजे तर ज्ञानवर्धन होईल).

माझ्यासारख्या साहित्य–वाचकांसाठी एखाद कहाणी नि कविता म्हणजे सरस रचनाही प्रत्येकांकात नक्की दिली पाहिजे–ही विनंती.

–श्यामविमल या पंजाबी भाषक हिंदी कवींचा परिचय त्यांच्या मराठी कवितांच्या द्वारे पूर्वी झालेलाच आहे. (**भाषा आणि जीवन** जुलै १९८३ पृ. ८–१० आणि मागील अंकातील 'धन परक्याचे' हे सदर पहा. ) आता त्यांच्या शंकेकडे वळू.

'आणि' हा शब्द दिसतो तितका साधा नाही. त्याच्या अनेक अर्थच्छटा संभवतात. सगळ्यात साधा अर्थ म्हणजे तार्किक अर्थ: 'आणि' च्या आधीच्या आणि नंतरच्या पदांची उलटापालट झाली तरी हा अर्थ असताना फरक पडत नाही. तो अर्थ असा की दोन्ही पदे लागू असली, खरी असली तर आणि तरच सबंध वाक्य लागू पडते, खरे असते.

माझ्यासाठी एक पाव आणि एक मक्खनपाकीट घेऊन ये.म्हणजेच, माझ्यासाठी एक मक्खनपाकीट आणि एक पाव घेऊन ये. म्हणजेच, माझ्यासाठी एक पाव घेऊन ये आणि एक मक्खनपाकीट घेऊन ये.

काही उदाहरणांत मात्र दोन्ही पदे लागू असावी लागतात एवढेच नव्हे तर ती सुटीसुटी लागू असू शकत नाहीत.

निळा आणि पिवळा मिसळल्यावर हिरवा होतो.

म्हणजे : निळा आणि पिवळा एकमेकात मिसळल्यावर हिरवा होतो.

म्हणजे असे मात्र नव्हे : निळा मिसळल्यावर हिरवा होतो आणि पिवळा मिसळ-ल्यावर हिरवा होतो.

काही उदाहरणांत पदांची उलटापालट केली तर अर्थ बदलतो. याचे एक कारण तिथे कालानुक्रम सुचवलेला असतो. ' आणि ' म्हणजे ' आणि त्यानंतर '

सकाळच कोवळं ऊन होतं आणि (त्याच वेळी) हवेत गारवा होता.

एकाएकी पाऊस आला आणि (त्यानंतर) हवेत गारवा आला.

पहिल्या उदाहरणात उलटापालट चालेल, पण दुसऱ्यात चालणार नाही. आधी–नंतर या संबंधापेक्षा वेगळा संबंध म्हणजे प्रधान–गौण हा सबंध. तोही कधीकधी ' आणि ' शब्दामुळे सुचवला जातो आणि त्यामुळेच तर ही शंका उदभवली आहे. ' भाषा ' गौण का ' जीवन ' गौण ? ' आणि ' शब्दाच्या अगोदरचे पद प्रधान आणि नंतरचे गौण असे असते ना ? समजा–

माझ्यासाठी एक पाव आणि एक मक्खनपाकीट घेऊन ये, ही आज्ञा घेऊन बाहेर पडल्यावर या दोन्हीपैकी एकच आणता येईल असे लक्षात आले तर काय ? ऐक-णारा अनुमान काढतो की ज्या पदाचा आधी उच्चार झाला ते बोलणाऱ्याच्या मनात प्रधान असल्यामुळे अगोदर आले.

मराठी अभ्यास परिषदेतर्फे पत्रिका काढणाऱ्यांच्या मनात ' भाषा ' अगोदर का आली ? कारण साधे आहे की मराठी लोकांच्या भाषिक गरजा, विशेषतः मराठी भाषेशी निगडित गरजा हे परिषदेने आपले प्रधान कार्यक्षेत्र मानल्यामुळे ' भाषा ' अगोदर आली. नंतर ' जीवन ' का आले ? विश्वाच्या व्यवहारात जीवन प्रधान आहे आणि भाषेचा विचार जीवनापासून अलग पाडून करता येत नाही हे लक्षात आल्यामुळे ' जीवन ' पाठोपाठ आले. (**भाषा आणि जीवन** १:१, जुलै १९८३ संपादकीय पहा.)

जीवनाला सामोरे जाताना ज्याला भाषा बाजूला ठेवताच येत नाही तो एक तत्त्वज्ञ तरी असतो किंवा कवी, ललित लेखक तरी असतो. अशांपैकी कुणी आपल्या कामासाठी नियतकालिक काढले असते तर त्याचे नाव ' जीवन आणि भाषा ' असे जरूर शोभले असते !

आता या लोकांशी परिषदेच्या पत्रिकेची मैत्री राहणार हे उघडच आहे. **भाषा आणि जीवन** मध्ये ललित लेखन यावे ही पत्रलेखकाची अपेक्षा रास्तच आहे. पत्रि-केत तसे ते अधूनमधून येत असतेही. मागील अंकात तर पत्रलेखकाच्या सहकार्यानेच एक कविता आलेली आहे. पत्रिकेचे संपादक ललितलेखनाच्या शोधात असतातच. पत्रिकेच्या साहित्यप्रेमी आणि साहित्य निर्मिणाऱ्या वाचकांनी जर मनावर घेतले तर पत्रलेखकाची अपेक्षा पुरी होणे अवघड नाही. मात्र पत्रिकेला मराठीतल्या साहित्याला वाहिलेल्या किंवा जीवनाला वाहिलेल्या नियतकालिकांशी स्पर्धा करा.

यची नाही आणि आपल्या विशिष्ट कार्याला अनुरूप असे आपले स्वरूप सोडायचे नाही. पत्रिकेत आतापर्यंत प्रसिद्ध झालेले ललितलेखन पाहिले (टेबल म्हणजे टेबल, बायकांची भाषा, एकूण सर्वनामे चार, भाषाप्रभुत्व... ) तर कुठे ना कुठे हा भाषेशी अनुबंध संभाळला आहे असे लक्षात येईल.

**संपादक**

## शब्द हवा आहे ' गट्स् 'साठी

**अंजली सोमण**

माझ्या एका परिचितांनी मला विचारलं, ' त्याच्यामध्ये गटस् आहेत ' असा शब्दप्रयोग आपण हल्ली सहन करतो. ' गटस्'ला मराठी प्रतिशब्द कोणता ? मला चटकन या अर्थाचा मराठी प्रतिशब्द सांगता आला नाही. मी विचार करत राहिले. ' गटस् ' म्हणजे नेमकं काय, धाडस, साहस, हुशारी, की तडफ ? मग मी या शब्दाचे इंग्रजी शब्दकोशातील प्रतिशब्द शोधायला लागले. तेव्हा लक्षात आलं की मुळात या शब्दाचे बरेच अर्थ आहेत. पण वरच्या वाक्यात हा शब्द ज्या अर्थानं वापरला गेला आहे. तो अर्थ इंग्लिश Slang भाषेतील आहे. ' गटस् ' चे प्रतिशब्द म्हणून Courage, Stamina आणि endurance हे तीन शब्द दिले गेले होते. मला सुचलेल्या प्रतिशब्दांशी हे अर्थ बरेचसे जुळणारे होते. पण तरी असं वाटलं की या तीन शब्दांपैकी कोणत्याच एका शब्दातून ' गटस् 'मधून जो अर्थ ध्वनित होतो तो ध्वनित होत नाही. ' गटस् 'चा नेमका अर्थ या तिन्ही शब्दांच्या एकत्रीकरणातू ने होतो. आजच्या सामाजिक परिस्थितीत तर ' गटस् 'चा अर्थ guts, Courage, endurance, something असा करावा लागतो. हे + something काय असू शकेल ?

आजच्या सामाजिक परिस्थितीत माणसाला पुढं यायचं असेल तर त्याच्यापाशी

(१) आत्मविश्वास असावा लागतो.

(२) धाडस असावे लागते ( Courage ); थोडं साहसही.

(३) उपजत हुशारी असावी लागते.

(४) उपजत हुशारी योग्य तिथे आणि योग्य त्या प्रकारे वापरण्याचं चातुर्य/ कौशल्य असावं लागतं.

(५) विरोधाला तोंड देण्याचा चिवटपणा असावा लागतो ( Stamina )

(६) मनासारखं घडेपर्यंत वाट बघण्याची सहनशक्ती असावी लागते ( endurance ).

**आणि शिवाय**

(७) स्वतःच्या हुशारीची जाहिरात करून इतरांवर प्रभाव पाडण्याचं तंत्र आत्मसात केलेलं असावं लागतं. (कारण आजचं जग शर्यतीचं आहे.)

या यादीत आणखीही काही भर घालता येईल. मला वाटतं. ज्या माणसापाशी यातील बऱ्याचशा गोष्टी आहेत, त्याच्यामध्ये 'गटस्' आहेत असं आपण म्हणतो. मग असं असेल तर 'गटस्'ला मराठीमध्ये नेमका प्रतिशब्द कोणता ? इंग्रजीमध्ये तरी योग्य प्रतिशब्द सापडतो का ? सापडत नसेल तर का ? हा शब्द Slang भाषेतला आहे म्हणून की सामाजिक परिस्थिती बदलली म्हणून ? की आणखी काही ? की हे सारे प्रश्न बाजूला ठेवून भाषेतल्या शब्दांना निश्चित आणि काटेकोर अर्थ क्वचितच असतात, असं म्हणून समाधान मानायचं ?

**एस्. एन्. डी. टी. महिला कला आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**कर्वे पथ, पुणे ४११००४**

**मा. संपादक.**

संदर्भ–शंका आणि समाधान : अंजली सोमण

प्रतिक्रिया– Guts हा इंग्लिश भाषेतला शब्द ज्या अर्थाने मराठीत वापरला त्याला **धमक** असा **सार्थ** मराठी शब्द रूढ आहे. नेमका हाच शब्द लेखिकेच्या नजरेतून कसा सुटला असावा ?

**वि. न. सरदेशपांडे**

School is a building that has four walls with tomorrow inside.

भविष्य पोटात घेऊन बसलेली चार भिंतींची इमारत म्हणजे शाळा.

## नजरेला पडलेले पत्र

मॉडर्न महाविद्यालय, पुणे येथे २८ फेब्रुवारी ते २ मार्च १९८६ रोजी 'गेल्या पंचवीस वर्षातील मराठी भाषा आणि साहित्य' या विषयावर चर्चासत्र झाले. त्यातील भाषाविषयक चर्चेविषयी श्री. शाम सोनावणे, शिळफाटा, जि. पुणे, यांनी संयोजकांकडे एक पूर्वसूचना पत्ररूपाने पाठवली.

'वकील, अभियंता, वैद्य (डॉक्टर) आणि सर्व पदवीधर यांनाही ती ती पदवी-अखेरपर्यंत दरवर्षी मराठी विषय १०० गुणांचा आवश्यक असला पाहिजे—व्यक्तिमत्त्वाची जडण—घडण, राष्ट्रीय जाणीव, सामाजिक जाणीव यासाठी 'मातृभाषा' ज्ञान क्रमवार हवेच आहे. आपण सर्वांनी असाच आग्रह नवीन अभ्यासक्रमाच्या संदर्भात धरावा. बहुसंख्य पदवीधर त्या त्या शाखांचे पदवीधर असतील पण सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीने ते कोरडे ठणठणीत असतात. बहुसंख्य पालकही सामूहिक जीवनाविषयी उदासीनच. तेव्हा 'मराठी' विषयाचे मानवतेसाठी 'महत्त्व' चांगले सर्वांनी पटवावे.'

पत्रलेखकाने आपल्या समाजाविषयी काही निरीक्षण नोंदले आहे, काही असमाधान व्यक्त करून उपाययोजनेची गरज सांगितली आहे, आणि याला धरून एक शैक्षणिक उपाय सुचवला आहे.

पत्रिकेच्या वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया थोडक्यात कळवाव्या आणि या विषयाबद्दलची चर्चा पुढे जाण्यास मदत करावी ही विनंती.

## रसातळची मराठी भाषा

**भाषा आणि जीवन** २ : २–२८–२९, उन्हाळा १९८४ या अंकात 'हसावं की रडावं' या शीर्षकाखाली आपण 'कर्नाटक स्टेट राज्य टुरिझम' ने दिलेली एक जाहिरात पुनर्मुद्रित करून तिच्यातील भाषादूषणांकडे वाचकांचे लक्ष वेधले होते. या पुनर्मुद्रित जाहिरातीवर आपले औपरोधिक संपादकीय भाष्य होते. भाषेचे स्वास्थ्य आणि सौंदर्य डोळ्यात तेल घालून एखाद्या जागल्याच्या दक्षतेने जपणे आवश्यक असते.

फार पूर्वीपासून आपल्याला आपल्यासारखे समानधर्मीय पहारेकरी मिळतील. अमेरिकेतील 'मरे' व 'लानमन' यांच्या ब्रिस्टलच्या साखरावगुंठित गोळ्यांची व 'फ्लोरिडाच्या पाण्याची' 'इंदुप्रकाश' वगैरे वर्तमानपत्रातून शंभर वर्षांपूर्वी नेहमी

जाहिरात येई. आपल्या मालाच्या जाहिरातीसाठी न्यूयॉर्क येथून मराठीत त्यांनी **'मनोरम वार्ता'** या नावाचे चोपडे छापून प्रसिद्ध केले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या तावडीत ते सापडले. मग काय विचारता ? 'निबंधमाला'च्या फेब्रुवारी १८७५ च्या अंकात त्यांनी या पुस्तिकेच्या तऱ्हेवाईक व बेंगरूळ भाषेचे आपल्या विनोदी व चुरचुरीत शैलीत दर्शन घडवले. भाषादूषणावर 'माला' कारांचा आधीच कटाक्ष. (वा. दा. ओक 'माला'कारांना 'महाराष्ट्र भाषाभिमानेच्छु पोलीस' म्हणतात ते उगीच नव्हे.) त्यात पुढचात अशी जाहिरात.

'रसातळची मराठी भाषा' हा त्यांच्या लेखाचा मथळाच कुतूहल चाळवणारा आहे. तो द्वयर्थीही आहे. 'रसातळची' म्हणजे अमेरिकेची असा एक अर्थ आणि रसातळची भाषा म्हणजे पार गाडली गेलेली भाषा असा एक अर्थ ! या लेखाचा आरंभ चुरचुरीत आहे. इंग्रजी भाषेचा प्रचार साऱ्या जगभर आहे. मराठीला ते भाग्य कुठले ? पण देवाची करणी अचित्य ! "हे पाहा. या आमच्या मेजावर न्यूयॉर्क येथे छापलेले मराठी पुस्तक !!!" असे विष्णुशास्त्री उद्गारतात. ते या पुस्तकाचे मुखपृष्ठ वाचकांच्या माहितीसाठी जसेच्या तसे छापतात. त्या मुखपृष्ठावर '**आपला जीव कसे लांबवून, मोठी वृद्धावस्था संपादावी**' असा त्या पुस्तकाचा विषय सांगितलेला आहे. प्रस्तुत चोपडचातील नामी स्थळे चिपळूणकर एका शेजारी एक प्रथम मांडतात. 'लानमन साहेब आपल्या सुरस व्याख्यानाची प्रस्तावना करतात.

**'चला वाटा वाट करू'**

'ब्रिस्टलच्या साखरावगुंठित गोळ्या' ह्या 'अश्या तीव्र आहेत की **बळवंतास रेचन** आणण्याजोग्या सामर्थ्यवान' 'त्या आपल्या **मोठ्या तेजानें पोट धर्मावर** नेतात.' 'मरे आणि लानमन' यांच्या फ्लोरिडाच्या पाण्यामुळे 'रोगीला समाधान अरोगीला आनंद असे प्राप्त होते.' 'चट्टीपट्टी करण्याचे समयी त्याचे अगत्य सर्वांस असते' 'मरे आणि लानमन यांचे फ्लोरिडाचे पाणी कायचे ? असा दूर देशांपासून चहूकडून आम्हास प्रश्न घालतात !!'

या जाहिरातीत "कोठे अगदीच अपरिचित, कोठे अर्धवट इंग्रेजी, कोठे निवळ संस्कृत, कोठे निवळ गांवढळ अशा शब्दांचा प्रयोग; वाक्यरचनेची मजा, विरामचिन्हाचा सर्वथा अभाव" याशिवाय 'लिंगवचनादिकांची अपूर्व मौज' कशी आढळते त्याकडे चिपळूणकर लक्ष वेधतात.

'दीर्घ प्रवासाने मनुष्य जसे मूळचे ओळखू येत नाही त्याप्रमाणेच आमच्याच न्यूयॉर्कवासी भाषेची आम्हांसच ओळख पटेनाशी झाली की काय ?' असा मिस्किल प्रश्न चिपळूणकर शेवटी विचारतात. लेखान्ती 'पातालवासी साहेबांस' त्यांनी फार महत्त्वाचा सल्ला दिला आहे. "लोकांच्या रोगपरिहारार्थ त्यांनी योजलेले उपाय

कितीही उत्कृष्ट असले तरी ते ज्या द्वाराने लोकांस कळायचे, ती (भाषा) वरच्या-सारखी अप्रयोजक असल्याने, त्यांच्याच कार्याचा विघात होतो. यास्तव अशा पुस्तकांची भाषान्तरे कर्तव्य असता, अमेरिकेतील महाविद्वान प्रोफेसरांकडून ते जितपत काम होईल त्याच्या दसपट चांगले दसपट कमी किंमतीला एखाद्या शाळे-तल्या पोराच्या हातूनही ते येथे सहज होईल. "

'कर्नाटक स्टेट राज्य टुरिझम' ला आपण यापेक्षा वेगळे काही सांगू शकू का?

**सुधाकर शं. देशपांडे, पाटकर महाविद्यालय, गोरेगाव पश्चिम, मुंबई ४०००५२**

## प्रतिमांची मुशाफिरी

भाषा आणि जीवन यांचे 'अतूट' नाते विशद करताना 'भाषेत जीवन **काठोकाठ** भरलेले असले तर भाषाही जीवनात **शिगोशीग** भरून राहिलेली आहे' (जाड ठसे माझे) असे विधान डॉ. अशोक रा. केळकर यानी केले आहे. (संपादकीय **भाषा आणि जीवन, मराठी–अभ्यास–परिषद-पत्रिका,** वर्ष १ अंक, १ जुलै १९८३ पृ. १) आणि त्या ओघात समान अर्थाचे पण वेगळ्या प्रतिमा घेऊन येणारे शब्द म्हणून **ओतप्रोत, काठोकाठ व शिगोशीग** या शब्दांचा निर्देश केला आहे. (प्रतिमा अनुक्रमे उभे आडवे विणलेले धागे, पाण्याने भरलेले भांडे, धान्याने भरलेले माप डॉ. केळकरांनीच हे अर्थ दिले आहेत.)

...गंमत अशी की मुळात एखाद्या अनुभवाची वा अर्थाची विशिष्ट छटा मूर्त करण्यासाठी जन्माला आलेल्या या शब्द–प्रतिमा मग पुढे त्या मूळ अर्थापुरत्याच मर्यादित राहात नाहीत. त्यांना स्वतःचे नाद–रूप–अर्थ–सौंदर्य प्राप्त होते व त्या स्वतंत्र मुशाफिरीला सज्ज होतात; निरनिराळ्या अनुभवांशी–अर्थांशी–स्वतंत्र संबंध प्रस्थापित करतात. त्यांची ही मुशाफिरी हाच मग एक गमतीदार व आपली सौंदर्य–जाणीव समृद्ध करणारा भाषिक अनुभव बनतो.

डॉ. केळकरांचे टिपण वाचत असताना (किंबहुना कदाचित त्यामुळेच) त्यात निर्देशिलेल्या **ओतप्रोत, काठोकाठ, शिगोशिग** या तीन प्रतिमांची अशीच मुशाफिरी पुढील कवितांच्या ओळींमधून माझ्या डोळ्यापुढे सहज उभी राहिली. पाहा.

१. घट भरा **शिगोशिग** भरा भरा
वाहु द्या कृपेचा वरुनि झरा
भा. रा. तांबे ('घट भरा शिगोशिग,' **समग्र कविता** १९२५)

२. या त्रिभुवन उजाळत प्रभाकरा
हा **काठोकाठ** कटाह भरा
कुसुमाग्रज ('हा काठोकाठ कटाह भरा,' **विशाखा** १९४२)

३. ऐन काळोखात **ओतप्रोत** स्तनांची धमकी देऊन उभे जीवन
'उजाड' विण्याची तुझी शक्ती मी अनुभवली आहे.
विंदा करंदीकर ('संहिता ७,' **धृपद** १९५१)

यातील **शिगोशिग** (घट) व **काठोकाठ** (कटाह) या प्रतिमांची मुशाफिरी तशी जवळच्याच प्रांतातली आहे. पण **ओतप्रोत (स्तन)** या प्रतिमेने मुशाफिरीचा किती दूरचा पल्ला गाठला आहे, यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

माझे टिपण केवळ प्रतिमांची मुशाफिरी दाखविण्यापुरतेच आहे. डॉ. केळकरांच्या (मला मान्य असलेल्या) विधानाचा परामर्श घेण्यासाठी नाही.

**रमेश तेंडूलकर, कीर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई ४०००२८**

स्थायी तु काव्यबलादपि नानुसन्धेय...न हि वागेव वाचिकम्...अपि तु तया निर्वृत्तम् ।

**श्रीशंकुक (अवतरण : अभिनवगुप्त, अभिनवभारती)**

# एका उचित धाडसाचे स्वागत

**कवितारती. ( काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा आणि कविविमर्श यांनाच केवळ वाहिलेले एकमेव मराठी द्वैमासिक ) संपादक व प्रकाशक : पुरुषोत्तम पाटील, विजय पोलीस वसाहत, देवपुर, धुळे ४२४००२. वर्ष १ : अंक १, नोव्हेंबर – डिसेंबर १९८५. ५ रु. ( वार्षिक वर्गणी ३० रु. तहहयात वर्गणी ३०० रु. )**

**परीक्षण लेखक : अक्षयकुमार काळे**

विक्रमी उत्पादनामुळे हेटाळणीचे भाग्य कवितेच्या नशिबी सततच आले आहे. कविता लिहिणे हे सर्वांत सोपे आणि उत्तम कविता लिहिणे सर्वांत कठीण असल्यामुळे कविता ही कधी वाङ्मयीन प्रतिष्ठेचा तर कधी वाङ्मयीन कुचेष्टेचा विषय बनते. साहित्य-संस्कृतिमंडळाने कवितानिर्मितीचा उत्साह वाढवल्यामुळे तो 'दखलपात्र गुन्हा' समजावा असे म्हणण्यापर्यंत मराठी समीक्षकांची मजल गेली. कवितेची प्रतिष्ठाच धोक्यात येण्याच्या या कालखंडात केवळ कविता या विषयालाच वाहिलेले नियतकालिक एखाद्या कवीने काढावे ही घटनाच मराठी काव्याच्या इतिहासात महत्त्वाची, आनंदाची, आणि स्वागतार्ह आहे.

यापूर्वी केवळ 'कविता' या विषयालाच वाहिलेले मासिक नारायण नरहर फडणीस काढीत असत त्यांची या प्रसंगी आठवण येणे स्वाभाविक आहे. 'त्या समर्थ, दमदार पावलांचे ठसे न्याहाळीत आणि त्यांच्या निःस्वार्थ काव्यनिष्ठेची पावन पाऊलधूळ भाळी लावीत आम्हीही आमची लहान पावले टाकण्याचा प्रयत्न करीत आहोत' अशी संपादकांची फडणीसांप्रती व्यक्त झालेली नम्र कृतज्ञता या क्षेत्रात त्यांना करावयाच्या मौलिक कार्याची दिशा दाखविणारी आहे. अर्थातच फडणीसांच्या काळी काव्यक्षेत्रातील परिस्थिती आणि आजची परिस्थिती यात महदंतर आहे. आजचे वाङ्मयीन वातावरण व त्याला येऊन चिकटणारे सामाजिक संदर्भ पूर्वीपेक्षा पुष्कळच भिन्न असल्यामुळे अशा काव्यविषयक मासिकाची जडणघडण एका वेगळ्याच दृष्टिकोनातून करावी लागणार हे अगदी उघड आहे.

याशिवाय समकालीन कविता, काव्यानुवाद, काव्याविषयीची सैद्धांतिक टिपणे, काव्य-परिचय, रसग्रहणे, कविव्यक्तिमत्त्वाचा शोध, काव्यसमीक्षाविषयक ग्रंथ व काव्यसंग्रहाची परीक्षणे इत्यादींच्या प्रकाशनाचा मनोदय संपादकांनी आपल्या संपादकीयामध्ये बोलून दाखविलेला असल्यामुळे त्यांनी स्वीकारलेल्या वाङ्मयीन जबाबदारीचा व्याप आणि

समकालीन कवींच्या कवितांबरोबरच काव्यसमीक्षा छापण्याचा संपादकांचा मनोदय स्तुत्य आहे. काव्य आणि काव्यशास्त्रसमीक्षा यांचा संबंध समवाय स्वरूपाचा आहे. दोन्हीच्या समांतर विकासाची परंपरा एका विशिष्ट कालखंडात संस्कृत काव्याच्या इतिहासात दिसून येते. मराठीत हा संबंध विस्कळीत झाल्याचे कुणालाही जाणवेल.

मराठी काव्य जितक्या वेगाने व विविध पद्धतीने निर्माण होत आहे तितक्या वेगाने व विविध पद्धतीने मराठी काव्यसमीक्षेची निर्मिती सध्याच्या कालखंडात झालेली दिसत नाही. समकालीन काव्यसमीक्षकांची संख्या कवींच्या मानाने तुटपुंजी आहे. जी काव्यसमीक्षा होते आहे ती फुटकळ, परीक्षणवजा असल्यामुळे तीत समग्रता आणि सातत्य नाही. काव्यसमीक्षेच्या क्षेत्रातील सातत्य दाखविणारी ज्ञानपरंपरा मराठीत नाही, त्यामुळे समीक्षेच्या क्षेत्रातील ज्ञानव्यवहार विकसित होत नाही. ज्या पूर्वसूरींचा काव्यसमीक्षात्मक विचार आणि भूमिका आपल्याला मान्य आहे त्यांचा विकास करणे, त्यातील उणिवा शोधून त्या ज्ञानाला सूक्ष्मता देणे, त्यांचे शुद्धीकरण करून अधिक परिष्कृत काव्यविचार देणे इत्यादी गोष्टींचा अभाव असल्यामुळे कविता व समीक्षा यांच्यातील समतोल ढळला आहे. कवितारतीसारखे काव्याचा समग्र विचार करणारे मासिक हा समतोल अधिक परिणामकारकतेने साधू शकते.

संपादकांनी आजचे विशेषीकरणाचे युग ध्यानात घेऊन काव्य या विशिष्ट वाङ्मयप्रकाराचे संगोपन आणि विकास करण्याचा हेतू मनात ठेवून हा प्रयत्न चालविला आहे. विशिष्ट वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात त्यांनी ही मर्यादा घालून घेतलेली असली, तरी कालखंडाच्या दृष्टीने ती घातलेली दिसत नाही. संतकवींकडेही त्यांनी दृष्टिक्षेप टाकलेला दिसतो. अर्वाचीनपूर्व कालखंडातील कवींचा पुरेसा विचार मराठी समीक्षेने केला आहे व आजही प्रचंड प्रसिद्धिमाध्यमे त्याकरिता उपलब्ध आहेत. सध्याचे कवितारतीचे लहान असणारे पात्र लक्षात घेता या प्राचीन कालखंडातील कवींविषयीचा स्वतंत्र मजकूर या द्वैमासिकातून देण्यात काही औचित्य आहे असे वाटत नाही. उलट काव्य आणि समीक्षा यांचा जिवंत संवाद साधावयाचा असेल, तर याच शतकातील कवींवर अधिक लक्ष केंद्रित करणे मला उचित वाटते. त्यामुळे या कालखंडातील काव्यासंबंधीचे लक्षणीय कार्य कवितारती करू शकेल. अर्वाचीन काळाशी संबंधित असे प्राचीन काव्यशास्त्रसंदर्भ मात्र टिपावयास हरकत नसावी.

मागच्या पिढीतील इंदिरा संत आणि मधल्या पिढीतील शंकर रामाणी यांच्या कविता सोडल्यास या अंकात विनायक बाघमारे, यशोधरा साठे, द. मा. धामणस्कर, अलोन, रजनी परुळेकर, मेघना पेठे, भ. मा. परसवाळे, अनिल द्रवीड, रायभान दवंगे, नंदिनी आत्मसिद्ध, उत्तम कोळगावकर, विकास पाटील, ललित सोनोने, अशोक बागवे, नारायण कुलकर्णी कवठेकर, अरुणा ढेरे इत्यादी विविध प्रवृत्तींच्या व विविध प्रवाहांचे

प्रातिनिधित्व करणाऱ्या कवींच्या कविता प्रकाशित झाल्याने त्यांना पुरेसा न्याय मिळत नाही, त्यापेक्षा चार पाच कवींच्या कवितांचे गुच्छ छापण्याने सुटा विक्षेपकारक प्रत्यय टळून एक प्रकारची समग्र अनुभूती वाचकाच्या प्रत्ययाला येते असे मला वाटते. अर्थातच ही बाब संपादकांच्या मनात असणारच असे गृहीत धरायला हरकत नाही.

या अंकात प्रकाशित झालेली इंदिराबाईंची 'प्रयाग' ही कविता वाचताना एकच अनुभूती बाईंना अजूनही किती ताकद देऊ शकते हे लक्षात येते. त्याच अनुभूतीच्या कडा किंवा तिला असणारे जवळदूरचे संदर्भ त्यांची प्रतिभा हुडकत जाते आणि शब्द-बद्ध करते. मुक्त शैली वापरूनही रचनेचे सौंदर्य राखते. विरामचिन्हांचा वापर करून प्रच्छन्न आशयाला आकार देते. पण बाईंची समग्र कविता आस्थेवाईक बारकाईने वाचलेल्या रसिकाला, बाई ज्या उत्कटतेने आजही त्यांच्या मूलभूत अनुभूतीला स्पर्श करून बळ मिळवितात त्या अनुभूतीला, स्पर्श करताना अवघड जाते. बाईंच्या जुन्या कवितांचे खोलवर उमटलेले ठसे अशा प्रसंगी विक्षेप करतात की काय असे वाटते.

या अंकातील इतर कवींच्या कविताही ताजेपणाचा प्रत्यय देणाऱ्या आहेत. विकास पाटील, उत्तम कोळगावकर, रजनी परुळेकर, कवठेकर इत्यादींच्या कविता वाचताना त्या कथेचे बळ आत्मसात करू पाहत आहेत याची जाणीव होते. ही पद्धत त्यांनी विकसित केल्यास सुबोध आशयाकडे व दीर्घ रचनेकडे पुढच्या कवितेचा कल झुकेल असे मला वाटते.

कवितारतीची वाटचाल बोरकरांच्या अमृतमहोत्सवी दिनी करण्यात आलेली असल्या-मुळे त्यांच्यावरचा बराच मजकूर या अंकात आहे. व. दि. कुलकर्णी यांच्या 'आनंद-वीणेतील धुंद धून' या लेखात, बोरकरांच्या पुण्यातील वास्तव्याचे, त्यांच्या सहवासातील क्षणांचे शब्दांकन केलेले आढळते. बोरकरांच्या संस्कारशील व्यक्तिविशेषांचे दर्शनही त्यांनी घडविले आहे. 'बोरकरांच्या कवितेतील राधा' हा प्रभाकर बागले यांचा अभ्यासपूर्ण लेखही चिकित्सकांना महत्त्वाचा वाटावा.

बोरकरांच्या 'सांजवेळ' आणि 'एकट्या माझ्याचसाठी' या कवितांची अनुक्रमे गंगाधर पाटील व अवन्ती भावे यांनी केलेली रसग्रहणे या अंकात आहेत. मराठीतील प्रमुख कवींवर फुटकळ समीक्षा पुष्कळ झाली. या कवींच्या एकेक कवितेचा अभ्यास होण्याची निकड आज निर्माण झाली आहे. अशा रसग्रहणांनी ती काही अंशी भागविली जाते.

गंगाधर पाटील यांनी 'सांजवेळ' या कवितेचे केलेले रसग्रहण महत्त्वाचे आहे, परंतु संपादकांनी या रसग्रहणाखाली दिलेली टीप विवाद्य आहे. ते म्हणतात, "मर्ढेकरादी नवकवींच्या कवितेत इंद्रियसंवेदनांची अतिशय तरल रूपे प्रतिमांकित करू पाहणारी जी प्रतिभा तिचा आविष्कार तत्पूर्वीच बोरकरांच्या १९३३ मधील 'सांजवेळ' या कवितेत आश्चर्यकारक रीतीने झालेला असल्याचे जाणवल्याने प्रा. गंगाधर पाटील यांनी १९७०

मध्ये प्रस्तुत टिपण लिहिले होते. ”

मर्ढेकरादो याचा अर्थ मर्ढेकर– पु. शि. रेगे– विंदा करंदीकर असाच केला गेला असल्यास त्यांच्या कवितेत इंद्रियसंवेदनाची रूपे बोरकरांच्या कवितेत शोधण्यात आली तशी तरल अस्पष्ट नसतात. कित्येक कवितांत ती आपल्या मूलस्वरूपात ठसठशीतपणे, पुष्कळदा तर काहीशा आक्रमकपणे बाहेर येतात. या रूपांना व्यक्त करणाऱ्या प्रतिभेच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास मर्ढेकर–करंदीकर यांची इंद्रियसंवेदना अनुभवून तिला शब्दरूप देणारी प्रतिभा व बोरकरांची प्रतिभा यांमध्ये मूलतः प्रकृतिभिन्नता आहे. ‘ सांजवेळ ’ या कवितेशी उपरोक्त कवींच्या काही कवितांची तुलना केल्यास ही प्रकृति-भिन्नता अगदी सहजच लक्षात येईल. मूलतः भिन्न प्रवृत्तींच्या कवींमध्ये अकारण प्रतिमा-साधर्म्य इथे शोधले गेले आहे. या मुद्याच्या संदर्भातील प्रथमतेचे क्षेत्र उगीचच बोर-करांना चिकविण्यात आले आहे.

या अंकात विजया राजाध्यक्ष यांचे ‘ स्मरण विस्मरणाच्या काठावर ’ आणि स. शि. भावे यांचे ‘ भाषा साहित्य आणि कविता ’ ही टिपणे आहेत. “ कवितेच्या भाषेत नेहमीची भाषा पाहू नका. कवितेच्या भाषेकडून, नेहमीच्या भाषेकडून ज्या व्यावहारिक अपेक्षा असतात त्या करू नका; कवीने वाचलेली, गायकाने पेश केलेली आणि रसिकाने एकट्याने अनुभवलेली, या कविता वेगळ्या आहेत हे ओळखा; रसिकाने एकट्याने वाचत अनुभवलेली कविता हीच खरी कविता ” अशा सुसंगत निष्कर्षापर्यंत भावे आले आहेत, तर या म्हणण्याच्या अगदी विरुद्ध प्रवास करून भा. ज. कविमंडन एका वैचारिक गोंधळात स्वतःच फसले आहेत. त्यांनी कविता भोगणे ’ या संकल्पनेचा आपल्या लेखात विस्ताराने विचार केला आहे. गो. वि. करंदीकरांच्या नावाला आपल्या लेखणीचा स्पर्श होऊ देण्याचे का टाळले हे अनाकलनीय आहे. ही संकल्पना करंदी-करांनी[१] मांडलेली असली तरी तिच्यात संपूर्ण अ-पूर्वता नाही. ज्ञानेश्वरांच्या खालील ओव्यांत तिचे बीज आढळते.

> हे शब्देवीण संवादिजे । इंद्रिया नेणितां **भोगिजे**
> बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ॥ ( १ : ५८ )

किंवा

> तेणे कारणे मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दावीन
> अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियाकरवी ॥ (६ : ३६ )

बींच्या ‘ काव्यानंद ’ या कवितेत ही संकल्पना करंदीकरांपूर्वीच आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी प्रकट झाली आहे.

---

१ गो. वि. करंदीकर, परंपरा आणि नवता पहिली आवृत्ती मुंबई १९६७ पृ. ५६ ते ६२

वृत्त्यन्तर्गत टाकणे कठिणता, तद्रूपता पावणे
काव्यानंदरसप्रसंग मग तो निस्संग संभोगणे

त्यातील शारीर अर्थाचे सूचन वाच्यार्थ पातळीवर करंदीकरांनी केले असले, तरी लक्ष्यार्थ शारीरिकता सुचविणारा नाही. करंदीकर मूलतः कवी आहेत ते प्रतिमांकित भाषा वापरणारच. संभोगानंद व काव्यानंद यातील साधर्म्य शारीरप्रतिमा वापरून करंदीकरांनी सुचविले आहे. दोन्ही एकच आहे असे त्यांना मुळीच म्हणावयाचे नाही व ही साधर्म्यकल्पना त्यांच्या आधी वींच्या उद्गारातून अगदी स्पष्टपणे प्रकट झाली आहे. ब्रह्मानंदाची कल्पना येण्यासाठी संभोगानंदाचा दाखला देण्याची पद्धत अध्यात्मात फार जुनी आहे, म्हणूनच काव्यानंदासाठी संभोगानंदाचा दाखला देणे यात फारसे नावीन्य नाही.

'भोगणे' यातून उत्कट तन्मयतेने अनुभव घेणे व कविमंडनांना दुखविणाऱ्या 'कपडे काढून' या शब्दांतून पूर्वग्रहमुक्तता किंवा अंगभूत नसलेल्या गोष्टींचा त्याग सूचित होतो. अधिक पुढे जाऊन बोलावयाचे झाल्यास 'कपडे काढून' याचा अर्थ रसविघ्ने[१] टाळून असा घेता येईल. अर्थात हा अर्थ तारतम्याने स्वीकारावयाचा आहे. खुद्द करंदीकर या संदर्भात म्हणतात, "कविता कशी भोगावी ? जशी जमेल तशी. पण त्यामुळे सर्वसामान्य वाचकाचा अधिक्षेप करावा असे मला वाटत नाही. उच्चभ्रू व अतिसंस्कारित वाचक हे पुष्कळदा काव्यानंदाच्या बाबतीत सर्वसामान्यांपेक्षाही खालच्या– म्हणजे कृत्रिम व निर्जीव– पातळीवर वावरत असताना आढळतात. कविता कशी भोगावी, असे त्यांनी विचारले तर त्यांच्यासाठी एक ग्राम्य उत्तर असे : 'कपडे काढून'."[२] करंदीकरांचा रोख रसिक कविता अनुभवीत असताना ज्या पातळीवर वावरत असतो त्या पातळीवर आहे. त्याचप्रमाणे 'स्वतःच्या अंगभूत मर्यादा ओळखता आदर्श पद्धतीच्या मागे लागून' कविता अनुभवण्याच्या खुळेपणावर आहे.

करंदीकरांच्या विवेचनाकडे; त्यातील मूलभूत विचारकेंद्राकडे फारसे गांभीर्याने लक्ष न देता कविमंडनांनी या संकल्पनेवर चुकीचे अर्थसंदर्भ लादले आणि नंतर त्यांचे खंडन केले आहे. त्यासंबंधी सखोल विचार करता येणे शक्य आहे पण तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे, तूर्त इतकेच की या संकल्पनेत 'खाजगीपणाचा' किंबहुना रसिकाच्या वैयक्तिक विचक्षणतेचा गौरव असेलही पण कविमंडन समजतात तसा तो अनावश्यक रोगट नार्सिसीजम नाही किंवा ती अति आणि विकृत आत्मलुब्धताही नाही. व्यक्तीच्या स्वतंत्र आस्वादक्षमतेचे महत्त्व अमान्य केले तर तिची आस्वादांतर्गत सर्जनशीलताही

---

१. ग. त्र्यं. देशपांडे, भारतीय साहित्यशास्त्र, दुसरी आवृत्ती, मुंबई १९६३
पृ. ३१० ते ३१३

२. गो. वि. करंदीकर, परंपरा आणि नवता, पहिली आवृत्ती, मुंबई १९६७ पृ. ६२

अमान्य करावी लागते. काव्यव्यापाराशी ही गोष्ट विसंगत ठरते. कविमंडनांनी 'कविता भोगणे' या संकल्पनेचा आश्रय घेऊन मराठीतील पूर्वीच्याच फार चर्चिलेल्या गेलेल्या वादाला पुन्हा तोंड फोडले आहे. तेव्हा या निमित्ताने नव्या बाटलीत जुनी दारू आणखी कोण कोण भरतो हे बघण्यासारखे असेल. ठरवलेच तर कोणतीही गोष्ट 'खळबळजनक' करता येते.

ऑक्टोबर १९३५ मध्ये **काव्यरत्नावली** हे मासिक बंद पडले आणि तब्बल ५० वर्षांच्या खंडानंतर नोव्हेंबर १९८५ मध्ये **कवितारती** सुरू झाले आहे. द. ग. गोडसे यांनी केलेले एका संवेदनेचे नामकरण एक समर्थ रूप घेऊन रसिकांसमोर सादर झाले आहे. कवी आणि काव्याभ्यासकांच्या दृष्टीने ही बाब आनंदाची आणि गौरवाची आहे. अशी नियतकालिके म्हणजे भावी काव्येतिहासाची मौलिक साधने होत. ही साधने साक्षेपाने जपणे आणि त्यांचे संवर्धन करणे यांची मोठीच जबाबदारी संपादकावर पडली असणे स्वाभाविक आहे. नियतकालिके एका विशिष्ट आणि वैशिष्ट्यपूर्ण अभिरुचीचे संगोपन करू शकतात याची जाणीव ठेवून ती सर्वसमावेशक, व्यापक आणि संपन्न होईल याकडे संपादक लक्ष देत आहेत असे गृहीत धरावयास हरकत नाही.

आर्थिक मदतीसाठी आवाहन करताना 'साहित्याची वाढ या अशा प्रकारच्या उपऱ्या आणि आडवळणी अनुदानाने होण्याचा फारसा संभव नाही. साहित्याचा जमाखर्च हा शेवटी ते वाचणाऱ्यांनीच भागवला पाहिजे." ही पु. शि. रेग्यांची भूमिका संपादकांनी केंद्रस्थानी मानलेली दिसते. ती गैर नाही पण सध्याच्या परिस्थितीत ती योग्यही नाही. 'कवितारती'सारख्या विशिष्ट वाङ्मयीन ध्येये असणाऱ्या प्रबुद्ध संपादकांसाठी असली अनुदाने उपरी वा आडवळणी ठरत नाहीत. उलट अट्टाहासाने नियतकालिकांवर विचित्र आर्थिक प्रसंग गुदरतात. साहित्य संस्कृती मंडळाने नवीन कवींना अनुदाने देऊन नकळत जसे खच्चीकरण केले तसा धोका अनुभवी संपादकांच्या संदर्भात संभवणे अशक्य आहे. तेव्हा अशी अनुदाने त्यांनी डोळसपणे स्वीकारावी.

काळाची गरज ओळखून एका कवीने हिंमतीने ही जबाबदारी उचलली याबद्दल मी पुरुषोत्तम पाटील यांचे अभिनंदन करतो. एका संपन्न, दर्जेदार आणि इतिहास निर्माण करणाऱ्या नियतकालिकाचे रूप या द्वैमासिकाला लाभेल असा मला या प्रसंगी विश्वास वाटतो.

**ए-वन राणी लक्ष्मीनगर, नागपूर ४४० ०२२**

शिक्षण ही गोष्ट तशी महागडी वाटते का ? पण अज्ञानाइतकी ती नक्कीच महाग पडत नाही !

## महाबँक-भाषाविषयक लेखन पारितोषिक वितरण समारंभ

१९८३ व १९८४ या दोन वर्षातील सर्वोत्कृष्ट भाषाविषयक लेखनाबद्दल कै. डॉ. सुहासिनी लद्दू यांच्या ' मराठीच्या प्रमाण भाषेचे स्वरूप ' या ग्रंथास महाबँक पारितोषिक देण्यात आल्याचे ' **भाषा आणि जीवन** 'च्या मागील अंकात कळवण्यात आलेले आहेच. या पारितोषिकाच्या वितरणाचा समारंभ दि. ११ जुलै रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी या पारितोषिकयोजनेचे मूळ प्रवर्तक, महाबँकेचे माजी अध्यक्ष डॉ. वसंतराव पटवर्धन हे होते. हे पारितोषिक स्वीकारण्यासाठी कै. डॉ. सुहासिनी लद्दू यांच्या कन्या सौ. प्रज्ञा सुखठणकर या उपस्थित राहिल्या होत्या. पारितोषिक स्वीकारताना त्यांनी आपल्या आईच्या कर्तव्यतत्परतेचे, कर्तव्यशीलतेचे वर्णन केले. याच प्रसंगी ' भाषेचे राजकारण ' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यात डॉ. राजेंद्र व्होरा आणि प्रा. राम बापट यांनी आपले विचार मांडले. डॉ. व्होरा यांनी नुकत्याच झालेल्या बेळगाव सीमासत्याग्रहामागील राजकारणाचे स्वरूप व मर्यादा स्पष्ट केल्या. प्रा. राम बापट यांनी आपल्या भाषणात राष्ट्रनिर्मिती व नवसमाजनिर्मिती यांच्यासाठी भाषेचा उपयोग न करता केवळ चलनी नाणे म्हणून भाषेचा उपयोग करण्याच्या प्रवृत्तीवर टीका केली. भारताच्या संदर्भात संस्कृत, पाली इ. भाषांच्या ऐतिहासिक वारशाकडे दुर्लक्ष करून, राष्ट्रनिर्मितीच्या बाबतीत त्यांचा सहभाग टाळण्याच्या वृत्तीचा त्यांनी निषेध केला. एकंदरीत समारंभ अगदी औचित्यपूर्ण झाला.

## पत्रिकेसाठी अनुदान मंजूर

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ यांनी **मराठी अभ्यास परिषद पत्रिके**साठी १९८६–८७ या वित्तवर्षापासून अनुदान मंजूर केले आहे. १२–०३–१९८६ च्या बैठकीमधला हा निर्णय पत्र क्रमांक प्रआम १०८५।३३४३, दिनांक १६।२१.०४. १९८६ मधून कळवण्यात आलेला आहे.

**पत्रिके**चे आतापर्यंतचे काम मंडळाच्या सभासदांच्या पसंतीस उतरले याचे **पत्रिके**च्या संयोजकांबरोबरच **पत्रिके**वर लोभ ठेवणाऱ्या वाचकांनाही समाधान वाटेल यात शंका नाही.

## पैसे भरण्याबद्दल सूचना

पैसे रोख दिल्यास आठवणीने पावती घ्यावी. मनीऑर्डरने किंवा चेकने पैसे पाठविल्यास चेक 'मराठी अभ्यास परिषद' या नावाने काढावा. मनीऑर्डर कूपनवर किंवा चेकसोबतच्या चिठ्ठीवर पैसे पाठवणाराचे नाव, पत्ता, रक्कम, आणि ती कशापोटी पाठवली ते अवश्य लिहावे. नमुना अंक मिळाला असल्यास तसा उल्लेख करावा. चेक बँकेच्या पुण्याबाहेरच्या शाखेचा असल्यास रकमेत २ रुपये वटणावळ म्हणून भर घालावी. पावती मागाहून पाठविली जाईल.

## पत्रिकेची वर्गणी

पत्रिकेची वार्षिक वर्गणी भरताना पत्रिकेचे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असेच राहील हे लक्षात घ्यावे. पत्रिकेचे वर्षात चार अंक निघतात. मात्र १९८३ मध्ये केवळ दोनच अंक निघाले आहेत. पत्रिकेचे चालू वर्षाव्यतिरिक्तचे अंक हवे असल्यास मिळू शकतील. सध्यातरी त्यांची आकारणी वर्गणीच्याच दरात करण्यात येते. ती पुढीलप्रमाणे :

चालू वर्गणी परिषदेच्या सामान्य सभासदांसाठी (सभासद वर्गणी धरून) वर्षाला ३० रु.

चालू वर्गणी संस्था आणि सभासद नसलेल्या व्यक्ती यांसाठी वर्षाला ४० रु.

सुट्या अंकाला (मग तो चालू वर्षाचा असो की मागील वर्षांपैकी असो) १० रु.

मागील अंक मागवताना वर्ष १ (१९८३) मध्ये फक्त दोन अंक निघाले, वर्ष २ (१९८४) पासून मात्र दर वर्षाला चार अंक निघाले हे लक्षात घ्यावे.

## परिषदेची वर्गणी

सामान्य सभासदाची वार्षिक वर्गणी वर दिलीच आहे. एका घरात एकापेक्षा अधिक सामान्य सभासद असले आणि त्यांपैकी एकाच्याच नावावर पत्रिकेचा अंक हवा असला तर इतर सभासदांनी केवळ १५ रु. भरावयाचे आहेत. उदाहरणार्थ एका घरात दोन सभासद आणि एक अंक अशी स्थिती असल्यास वर्षाला ३० रु. + १५ रु. भरावे लागतील.

आजीव सभासदत्वासाठी २०० रु. (परदेशी अंक पाठवायचा असल्यास शिवाय १०० रु.); देणगीदारासाठी ५०० रु. किंवा जास्त; आश्रयदात्यासाठी १००० रु. किंवा जास्त. (आजीव, देणगीदार, आश्रयदाता सभासदांना पत्रिकेची वेगळी वर्गणी नाही.)

परिषदेचे सभासदत्व व्यक्तीला मिळेल, संस्थेला नाही.

## जाहिरातीसाठी दर

पूर्ण पान ७५० रु., अर्धे पान ४०० रु., पाव पान २५० रु., शुभेच्छासूचना १०० रु., आवरणपृष्ठ चार १००० रु., आवरणपृष्ठ दोन । तीन ८०० रु. जाहिरात हिंदीत वा इंग्रजीत असल्यास चालेल, मराठीत असल्यास उत्तम.

नोंदणी क्रमांक : 040048/83

*Introducing a new series of Marathi teaching materials for the use of English-knowing learners whether Indian or non-Indian.*

MARATHI STRUCTURAL PATTERNS : BOOK ONE

Illustrative and practice materials, introduction to grammatical structures and some everyday communication and vocabulary woven into 32 convenient units. 470 pages; 1982; Rs. 150

MARATHI CONVERSATIONAL SITUATIONS

Fourteen conversations ranging from Getting acquainted to Meeting officials. 248 pages; 1983; Rs. 90

MARATHI READINGS

Twentyfive adult reading units to complement and follow the preceding, coverring narration, description, letterwriting, and other modes. 89 pages; 1983; Rs. 50

MARATHI VOCABULARY MANUAL

MARATHI ILLUSTRATED VOCABULARY

Companions to the rest : Classified Marathi-English English-Marathi Vocabularies. 86 pages; 1983; Rs. 75. 45 pages; 1983; Rs. 35

Handsomely produced set in Crown Quarto ($9\frac{1}{2}'' \times 7\frac{1}{2}''$); Rs. 400 for the set; more volumes to follow to cover more advanced stages.

The authors, Dr. Maxine Berntsen and Jai Nimbkar, have brought their extensive experience and knowledge of traditional as well as modern methods to bear on this collaborative effort to fill a serious gap. The recent realization of the need for the teaching of Marathi as a second language has made all of us acutely aware of the paucity of such carefully prepared materials that can be used in the classroom as well as in a 'self-taught' or 'tutorial' approach.

Available from the publishers : (1) Marathi Abhyas Parishad (2) Granthali, 34/902 Nehrunagar, Bombay 400 024. Also from : International Book Service, Deccan Gymkhana, Pune 411 004.

Libraries get a 10% discount; members of Parishad or Granthali get a 50% discount. Outstation cheques should add Rs. 2 towards collection charges.